७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. २० जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १७५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# संरक्षण सज्जतेसाठी देशाची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

**संरक्षण मंत्री राजनाथ सिंह : नागपूर संरक्षण उत्पादन क्षेत्रातील महत्वाचे केंद्र म्हणून उदयास येईल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

नागपूर (दै. संध्या)

■ अंबाझरी आयुध निर्माणीतील १० हजार टन क्षमतेच्या अत्याधुनिक अल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेस प्रकल्पाचे भूमिपूजन




देशाला भविष्यात संरक्षणसज्ज ठेवायचे असेल तर संरक्षण क्षेत्राशी संबंधित अत्यावश्यक गरजांवर स्वतःचे नियंत्रण असणे अत्यंत गरजेचे आहे. त्या दृष्टीने यंत्र इंडियाचा अत्याधुनिक अल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेस प्रकल्प भारताचे आयात अवलंबित्व कमी करून देशाला आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने अत्यंत महत्त्वाचा ठरेल. या प्रकल्पाच्या माध्यमातून संरक्षण, एरोस्पेस, विमाननिर्मिती, क्षेपणास्त्र कार्यक्रम, रेल्वे आणि इतर धोरणात्मक क्षेत्रांसाठी आवश्यक असलेल्या उच्च दर्जाच्या अल्युमिनियम मिश्रधातूंच्या निर्मितीला मोठी चालना मिळेल आणि देशाच्या संरक्षण क्षमतेत मोठी भर पडेल, असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज येथे व्यक्त केला. यंत्र इंडिया लिमिटेडच्या अंबाझरी आयुध निर्माणीतील १० हजार टन क्षमतेच्या अत्याधुनिक अल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेस प्रकल्पाच्या भूमिपूजन कार्यक्रमात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह बोलत होते.

या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी संरक्षण उत्पादन विभागाचे सचिव संजीव कुमार, संयुक्त सचिव गरिमा भगत, यंत्र इंडिया लिमिटेडचे सीएमडी विजय कुमार अय्यर यांच्यासह संरक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह म्हणाले, हा प्रकल्प म्हणजे आयातीवर अवलंबून राहण्याऐवजी देशांतर्गत उत्पादनक्षमतेला चालना देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. संरक्षण प्रणाली, क्षेपणास्त्र कार्यक्रम, अंतराळ संशोधन, विमान उद्योग, रेल्वे आणि इतर धोरणात्मक क्षेत्रांसाठी आवश्यक असलेले मोठ्या आकाराचे व गुंतागुंतीचे अल्युमिनियम मिश्रधातू घटक या प्रकल्पातून तयार करता येणार आहेत. त्यामुळे महत्त्वाच्या अशा अल्युमिनियम घटकांच्या आयातीवरील अवलंबित्व कमी होऊन देशांतर्गत पुरवठा साखळी अधिक मजबूत होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. आधुनिक लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे आणि अंतराळ कार्यक्रमांसाठी हलके, मजबूत आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थिती सहन करू शकणारे धातू आवश्यक असतात. अशा धातूंची निर्मिती विशेष प्रक्रियेद्वारे केली जाते. त्यामुळे हा प्रकल्प संरक्षण उत्पादन क्षेत्रासाठी अत्यंत महत्वाचा ठरणार असल्याचे नमूद करून संरक्षणमंत्री राजनाथसिंह म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरच्या यशात देशात विकसित झालेल्या संरक्षण उपकरणांची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. मोठ्या यंत्रणांची खरी ताकद हजारो लहान-मोठ्या घटकांमध्ये दडलेली असते. अल्युमिनियम एक्स्ट्रूजन प्रेसमुळे या क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे वाटचाल अधिक वेगाने होईल, असे ते म्हणाले. संरक्षण उत्पादन क्षेत्रातील देशाच्या प्रगतीचा आढावा घेताना राजनाथ सिंह यांनी सांगितले की, २०१४ मध्ये देशांतर्गत संरक्षण उत्पादन सुमारे ४६ हजार कोटी रुपये होते. २०२५-२६ या आर्थिक वर्षात विक्रमी १.७८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. संरक्षण क्षेत्रातील निर्यातही २०१४ मधील एक हजार कोटींवरून वाढून ३८ हजार ४२४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. पुढील दोन ते तीन वर्षांसाठी निश्चित केलेले तीन लाख कोटी रुपयांचे संरक्षण उत्पादन आणि ५० हजार कोटी रुपयांच्या संरक्षण निर्यातीचे उद्दिष्ट नियोजित वेळेपूर्वीच साध्य होईल, असा विश्वास संरक्षणमंत्र्यांनी व्यक्त केला.

## महाराष्ट्र हे घाणेरडे राजकारण सहन करणार नाही : आदित्य ठाकरे

मुंबई (दै. संध्या)



शिवसेना ठाकरे गट पुन्हा एकदा मोठ्या फुटीच्या उंबरठ्यावर असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने राबवलेल्या 'ऑपरेशन टायगर'मुळे ठाकरे गटाचे 6 खासदार फुटल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. या संभाव्य बंडाच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाकडून अधिकृत व्हिप जारी करण्यात आला होता. मात्र असे असूनही या 6 पैकी एकाही खासदाराने पक्षाच्या संसदीय दलाच्या बैठकीला हजेरी लावली नाही. बैठकीकडे पाठ फिरवल्यामुळे सदर खासदार फुटल्याचे आता जवळपास निश्चित मानले जात असून, यावर आता आमदार आदित्य ठाकरे यांनी टीका केली आहे. आदित्य ठाकरे यांनी ट्विट करत म्हटले की, पुन्हा एकदा आपण घाणेरड्या राजकारणाचे विदारक उदाहरण पाहत आहोत. एहसान फरामोश आणि विकाऊ अशा सडक्या वृत्तीचे हे काही ठराविक व्यक्ती 2024 मध्ये ज्यांच्यामुळे जिंकून आले, त्यांनाच दगा देत आहेत. कितीही कारणे द्या... सत्य एकच आहे. तुम्ही स्वतःला निर्लज्जपणे विकले आहे. स्वतःला तर विकलेच, पण त्यासोबत तुमची प्रतिष्ठा, तुमचे नाव आणि तुमच्या कुटुंबाचे नावही पणाला लावले आहे, असा हल्लाबोल ठाकरे यांनी केला आहे. महाराष्ट्र हे घाणेरडे राजकारण सहन करणार नाही... मुळीच नाही! ह्या काळोखात प्रकाश देणार ती फक्त आणि फक्त आपली मशाल, असेही आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. यापूर्वी आदित्य ठाकरे यांनी पक्षात सर्व खासदार आपल्यासोबत असून आमचा आमच्या खासदारांवर अंधविश्वास असल्याचे म्हटले होते. मात्र त्यांचा अंधविश्वासानेच त्यांचा विश्वासघात केल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

## आमदार निवासात पाण्याची टंचाई

### कॅन्टीनमध्ये कागदी प्लेट्स वापरण्याची वेळ

मुंबई (दै. संध्या)



■ विजय वडेट्टीवारांनी पाणीटंचाईवरून सरकारला घेरले

महाराष्ट्रात सध्या पाणीटंचाईचे भीषण संकट गडद होत चालले असून, विरोधकांनी यावरून सत्ताधारी महायुती सरकारला धारेवर धरले आहे. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडियावरून सरकारवर अत्यंत बोचरी टीका केली आहे. "संपूर्ण राज्य दुष्काळाच्या छायेत होरपळत असताना, महायुती सरकार मात्र केवळ आमदार आणि खासदार फोडण्याच्या राजकारणात मग्न आहे," असा थेट आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. पावसाळी अधिवेशन तोंडावर आलेले असताना मुंबईतील आमदार निवासातील एक धक्कादायक वास्तव वडेट्टीवार यांनी समोर आणले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून आमदार निवासात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये भांडी धुण्यासाठीही पाणी शिल्लक नसल्याने, लोकप्रतिनिधींना चक्क कागदी प्लेट्समध्ये जेवण वाढण्याची वेळ आली आहे. "ज्या सरकारला स्वतःच्या आमदारांच्या निवासातील पाण्याचे साधे नियोजन करता येत नाही, ते संपूर्ण महाराष्ट्राचा पाण्याचा एवढा मोठा प्रश्न कसा काय सोडवणार?" असा खोचक सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. राज्यातील धरणांमधील पाणीसाठा आता अत्यंत धोकादायक पातळीवर पोहोचला असून, ग्रामीण भागातील शेतकरी हवालदिल झाला आहे. अनेक प्रमुख शहरांमध्येही आतापासूनच पाणीकपात लागू करण्यात आली आहे. या गंभीर परिस्थितीवर बोट ठेवत विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला. ते म्हणाले, "एकीकडे महाराष्ट्रातील जनतेला पिण्याच्या पाण्याचा एक थेंब मिळणे कठीण झाले आहे, तर दुसरीकडे सत्ताधारी आमदार, खासदार आणि नगरसेवक फोडण्यासाठी कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करत आहेत.

## रविकांत तुपकरांचे अन्नत्याग आंदोलन अखेर स्थगित

**■ गिरीश महाजनांच्या मध्यस्थीला यश, पण सरकारला दिला ४ दिवसांचा 'अल्टीमेटम' ■**

बुलढाणा (दै. संध्या)



शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी शेतकरी क्रांतिकारी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी पुकारलेले बेमुदत 'अन्नत्याग आंदोलन' आज पाचव्या दिवशी स्थगित करण्यात आले आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सरकारच्या वतीने मध्यस्थी करत आंदोलनस्थळी भेट दिली. यावेळी महाजन यांनी येत्या चार-पाच दिवसांत मुख्यमंत्र्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर, तुपकर यांनी आपल्या आईच्या आणि मंत्री महाजन यांच्या हस्ते ज्युस पिऊन अन्नत्याग आंदोलन तात्पुरते स्थगित केले. मात्र, "चार दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा रस्त्यावर उतरू," असा खणखणीत इशाराही त्यांनी सरकारला दिला आहे.

मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले की, राज्य सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अत्यंत संवेदनशील आहे. पावसाळी अधिवेशन सुरू असले तरी, येत्या चार ते पाच दिवसांत मुंबईत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कर्जमाफीच्या अटी ठरवणाऱ्या 'प्रवीण परदेशी समिती'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत रविकांत तुपकर आणि त्यांच्या शिष्टमंडळाची स्वतंत्र बैठक आयोजित केली जाईल.

तुपकर यांच्या अन्नत्यागामुळे त्यांची किडनी आणि साखरेची पातळी खालावल्याचा वैद्यकीय अहवाल आल्याने, महाजन यांनी त्यांना प्रकृतीची काळजी घेण्याची विनंती केली आणि चळवळीतील नेत्याचे आरोग्य महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले. रविकांत तुपकर यांनी स्पष्ट केले की, "सरकारच्या विनंतीला आणि शब्दाला मान देऊन आम्ही केवळ 'अन्नत्याग' थांबवत आहोत, पण आमचा लढा थांबलेला नाही. सरकारला आम्ही चार ते पाच दिवसांचा वेळ देत आहोत."

जर मुंबईतील बैठकीत शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक आणि ठोस निर्णय झाला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रभर अत्यंत आक्रमकपणे आणि लोकशाही मार्गाने रस्त्यावरची आंदोलने पुन्हा सुरू केली जातील, असा इशारा त्यांनी दिला.

सरसकट कर्जमाफी (OTS ला विरोध): सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीत 'वन टाईम सेटलमेंट' (OTS) ची जाचक अट आहे. (उदा. ५ लाख कर्ज असल्यास, वरचे ३ लाख भरल्याशिवाय २ लाखांची माफी मिळत नाही). शेतकऱ्यांकडे वरचे पैसे भरण्याची क्षमता नसल्याने ही अट रद्द करून सरसकट २ ते ५ लाखांपर्यंत कर्जमाफी द्यावी.

नियमित कर्ज भरणाऱ्यांना दीड लाख रुपये: जे शेतकरी नियमित कर्ज भरतात, त्यांना केवळ ५० हजार रुपये न देता किमान दीड लाख रुपये प्रोत्साहनपर अनुदान द्यावे. पीक विमा कंपन्यांचा घोटाळा आणि गुन्हे: बुलढाणा जिल्ह्यात ८०% नुकसान होऊनही कंपन्यांनी शेतकऱ्यांना 'झिरो' (शून्य) रुपये दिले आहेत. शेतकऱ्यांना मूर्खात काढणाऱ्या या पीक विमा कंपन्यांवर थेट गुन्हे (कलम ४२०) दाखल करावेत. सोयाबीन, कापूस आणि कांद्यासाठी 'दर नियंत्रण समिती': उसाच्या धर्तीवर या पिकांसाठीही स्वतंत्र समिती नेमावी. सोयाबीन पेंड (DOC) निर्यातीला प्रोत्साहन द्यावे, जेणेकरून सोयाबीनला भाव मिळेल.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

ढिंग-टांग




## धाराशिवच्या पटावरील नवे रण : सत्तेच्या साथीने पारंपरिक वैर

मुंबई (दै. संध्या)



धाराशिवचे खासदार ओम राजेनिंबाळकर हे शिवसेनेच्या शिंदे गटात गेल्यात जमा आहेत. या नव्या राजकीय घडामोडींमुळे धाराशिवचा राजकीय पट पुन्हा बदलू लागला आहे. खासदार ओमराजे निंबाळकरांच्या लोकप्रियतेचा लंबक दुसऱ्या बाजूला वळताना दिसतो आहे. धाराशिवसारख्या मागास भागातील राजकारणाचा पोत सतत वळण बदलणारा. यात २००४ च्या विधानसभा निवडणुकीत डॉ. पद्मसिंह पाटील यांचा केवळ ४८४ मतांनी झालेला विजय, त्यानंतर पवन राजेनिंबाळकरांची हत्या, त्यांचे चिरंजीव ओम यांचा राजकारणातील प्रवेश, पुढे डॉ. पद्मसिंह पाटील यांना झालेली अटक, राणा जगजीतसिंह पाटील यांचा विधान परिषदेतून झालेला राजकीय प्रवेश, त्यांचा जय-पराजय, पुढे पक्षबदलाचे नवे वळण. भाजपबरोबर जुळवून घेतलेल्या समीकरणात आता नवी भर पडली असताना ओम राजेनिंबाळकरांनी ठाकरे गटाबरोबर घेतलेल्या फारकतीमुळे धाराशिवच्या राजकारणात सत्तापक्षात एका म्यानात दोन तलवारी असे चित्र निर्माण होत आहे. २००४ ची विधानसभेची निवडणूक. मतदानाचा दिवस उजाडला. त्या दिवशी गावातल्या प्रत्येकाच्या घरात 'जनप्रवास' दैनिकाचा अंक फुकट वाटण्यात आला. गावोगावी वर्तमानपत्राचे गठ्ठे पोहोचले. त्यात बातमी होती : 'डॉ. पद्मसिंह पाटील यांना पवन राजेनिंबाळकरांचा पाठिंबा.' शीर्षकासमोर मात्र प्रश्नचिन्ह होते. गावागावात मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागलेल्या. मतदारांच्या मनात संभ्रम निर्माण झालेला. सकाळच्या पहिल्या टप्प्यात डॉ. पाटील तेर येथे मतदान करण्यासाठी आलेले. सकाळीच त्यांना बातमीदारांनी गाठले तेव्हा त्यांनी असे काही झाल्याचे आपणास माहीत नसल्याचे सांगितले. पुन्हा त्यांना कोणी या प्रकरणी काही विचारले नाही. या निवडणुकीत डॉ. पाटील यांना पहिल्यांदाच पवन राजेनिंबाळकर यांनी आव्हान दिले होते. या बातमीने निंबाळकरांच्या गोटात अस्वस्थता होती. सकाळी आठ वाजता ते गावोगावी जाऊन खुलासा करीत होते. त्यांचे कार्यकर्ते बसवर, ऑटोरिक्षांच्या काचांवर खडूने मजकूर लिहिण्यासाठी धावले. 'पद्मसिंह पाटील यांना पाठिंबा दिलेला नाही, रेल्वे इंजिन चिन्हालाच मत द्या.' रेल्वे इंजिन हे पवन राजेनिंबाळकरांचे निवडणूक चिन्ह होते.

याच काळात राणा जगजीतसिंह पाटील राजकारणात येतात. पण उस्मानाबादचं राजकारण सतत या हत्येभोवती फिरत राहतं. डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या अविचल सत्तेला आव्हान देण्यासाठी भाजप तेव्हा राजकीय पटावर नव्हतीच. मिलिंद पाटील नावाचा व्यवसायाने वकील असणारा निष्ठावंत कार्यकर्ता वगळता या जिल्ह्यात कोणी काम करत नव्हते. भाजपने पुढे त्यांच्या पदरी काहीही दिले नाही. पण भाजपचे आणि काँग्रेसचे नेते डॉ. पद्मसिंह पाटील यांची सत्ता घालवता यावी म्हणून ओम राजेनिंबाळकरांना मदत करत होते. यात सध्या भाजपमध्ये असणारे बसवराज पाटील, मधुकरराव चव्हाण यांचे नाव आवर्जून घेता येईल. पुढे या सत्तेला खऱ्या अर्थाने सुरुंग लागला तो तेरणा कारखान्याच्या निवडणुकीत. 'साखरेमाये'ने बांधलेला मतदारसंघ ढासळला. तेरणा कारखान्याच्या अध्यक्षपदी ओम राजेनिंबाळकर यांच्या आईला अध्यक्ष बनविण्यात आले. संस्था चालविण्याचा अनुभव कमी असणाऱ्या संचालक मंडळास पुढे कारखाना नीट चालवता आला नाही. तो बंद पडला आणि अनेक वर्षांनंतर आता तो एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे तानाजी सावंत चालवत आहेत.

शरद पवार यांच्या पाठिशी उभा राहणाऱ्या जिल्ह्यात कितीही काम केले तरी भाजपच्या बाजूने सहजासहजी वळणार नाही, हे माहीत असणाऱ्या भाजपच्या धुरिणांनी राणाजगजीतसिंह पाटील यांना आपल्या बाजूने घेण्याचे ठरवले. सोलापूरमध्ये एका जाहीर कार्यक्रमात त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. तत्पूर्वी धाराशिव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणाऱ्या राणा जगजीतसिंह पाटील यांनी तुळजापूर हा मतदारसंघ निवडला. ते निवडून आले. काँग्रेसचे मधुकरराव चव्हाण, त्यापुढील निवडणुकीमध्ये धैर्यशील पाटील यांचा त्यांनी पराभव केला. तुळजापूरमधून आता भाजप-शिवसेना महायुतीचे निर्णय घेतले जात आहेत. कमळ चिन्ह निवडून यावे म्हणून काम करणारे संघ परिवारातील कार्यकर्ते या खेळींकडे अचंबित होऊन पाहतात. पण अनेक वर्षांनी धाराशिवमध्ये कमळ फुलले. राष्ट्रवादीचे चिन्ह दिसेनासे झाले. या पार्श्वभूमीवर ओम राजेनिंबाळकर यांचा पक्षबदल सत्तेतील सुंदोपसुंदी वाढविणारा असणार आहे, हे नक्की. राणाजगजीतसिंह पाटील यांच्यासमोर आता सत्तेमध्ये विरोधक उभे राहतील.

## मी फक्त उद्धव ठाकरेंनाच उत्तर देण्यास बांधील

*अंधारेंना नाही! कृष्णा आष्टीकरांचा सुषमा अंधारेंवर जोरदार पलटवार*

नांदेड (दै. संध्या)



हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची साथ सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गोटात प्रवेश केल्याच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली. या घडामोडींवरून ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आष्टीकर पिता-पुत्रांवर टीकेची झोड उठवल्यानंतर विधान परिषद निवडणुकीतील ठाकरे गटाचे उमेदवार कृष्णा पाटील आष्टीकर यांनी प्रत्युत्तर देताना, “मी फक्त उद्धव ठाकरेंनाच उत्तर देण्यास बांधील असून सुषमा अंधारे यांच्या आरोपांना उत्तर देण्याची माझ्यावर कोणतीही जबाबदारी नाही,” अशी स्पष्ट भूमिका मांडली.

ऐन विधान परिषद निवडणुकीच्या काळात सुषमा अंधारे यांनी फेसबुक पोस्टद्वारे “कृष्णा आष्टीकर हे त्यांच्या वडलांइतकेच धूर्त आणि चतुर आहेत,” अशी टीका केली होती. त्यानंतर कृष्णा आष्टीकर यांनी या वक्तव्यावर सडेतोड प्रतिक्रिया दिली.

नांदेड विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदारसंघातील मतदानानंतर माध्यमांशी बोलताना कृष्णा आष्टीकर म्हणाले, “सुषमा अंधारे यांनी केलेल्या आरोपांना उत्तर देण्यास मी अजिबात बांधील नाही. त्यांनी आमच्या संपूर्ण खानदानाचाच उद्धार केला. त्यामुळे मला अत्यंत वाईट वाटले. वडील एका पक्षात आणि मुलगा दुसऱ्या पक्षात असण्याची उदाहरणे महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन नाहीत. अजून माझे वडील नेमके कुठे गेले आहेत, हे अधिकृतपणे स्पष्ट झालेले नसताना काही नेत्यांना एवढी घाई का झाली आहे, हेच मला समजत नाही.”

ते पुढे म्हणाले, “खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचा फोन बंद असल्यापासून माझा त्यांच्याशी कोणताही संपर्क झालेला नाही. मात्र मी आजही उद्धव ठाकरेंचाच माणूस आहे. माझ्या सर्व राजकीय घडामोडींची माहिती मी मिलिंद नार्वेकर यांच्या माध्यमातून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यापर्यंत पोहोचवली आहे. मी फक्त उद्धव ठाकरेंनाच उत्तर देण्यास बांधील आहे.

### काँग्रेसची मते कोणाला ?


नांदेड जिल्ह्यात काँग्रेसचे एकूण ९२ नगरसेवक मतदार आहेत. विधान परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार रामदास पाटील सुमठाणकर यांना काँग्रेस पक्षाने माघार घ्यावयास भाग पाडल्यानंतर काँग्रेसचे अनेक मतदार भाजप आणि त्यांचे उमेदवार अमर राजूरकर यांच्या संपर्कात आल्याची चर्चा सुरू होती. त्यामुळे ही मते कुणाकडे वळली असावीत ? यावर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत.

## संपादकीय

# ‘महिना झाला, मी सिगारेट ओढलेली नाही...’;

विविध देशांच्या राष्ट्रप्रमुखांची एखादी शिखर परिषद होते त्यावेळी ते प्रचंड तयारी करून येतात, आपल्या कामावर, आपल्याला काय बोलायचं आहे, यावरच फोकस करतात आणि फक्त गंभीर विषयांवरच अत्यंत गंभीरपणे चर्चा करतात, असा अनेकांचा समज असतो; पण खरंच तसं असतं का?.. फ्रान्स येथे नुकतीच ‘जी-७’ देशांची शिखर परिषद झाली. या बैठकीला अनेक जागतिक नेते उपस्थित होते. या बैठकीच्या आधी त्यांच्यात चर्चा झाली, हास्यविनोदात ते रमले आणि एकमेकांची त्यांनी चेष्टामस्करीही केली. त्यांच्यात झालेल्या या अनौपचारिक गप्पा मायक्रोफोनवर रेकॉर्डही झाल्या. त्याबद्दल सध्या जगभरात चर्चा सुरू आहे. काय गप्पा झाल्या असतील त्यांच्यात?.. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी सिगारेट सोडल्याबाबत केलेल्या वक्तव्याची विशेष चर्चा होत आहे. शिखर परिषद सुरू होण्यापूर्वी सर्व नेते एकमेकांशी अनौपचारिक गप्पा मारत होते. अर्थात, शिखर परिषदेसंदर्भातला एकही मुद्दा त्यांच्या बोलण्यात नव्हता. घरी किंवा कुटुंबात एकत्र बसलेलो असताना जसं आपण गप्पा मारतो, तसं सारे जण बोलत होते. बोलता बोलता जॉर्जिया मेलोनी म्हणाल्या, आज मी तब्बल तीन कप कॉफी प्याले आहे. हे ऐकून युरोपियन युनियनच्या प्रमुख उर्सुला व्हॉन डेर लेयेन यांनी आश्चर्यानं विचारलं, सकाळी लवकर उठण्यासाठी का? यावर जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मर्त्झ यांनी विनोदानं विचारलं.. आणि किती सिगारेट ओढल्या? त्यांना नकार देत मेलोनी म्हणाल्या, एक महिन्यापासून मी सिगारेटच ओढलेली नाही.. हे ऐकताच कॅनडा, ब्रिटन, जपान आणि युरोपियन युनियनच्या नेत्यांनी त्यांचं अभिनंदन केलं.

आनंद व्यक्त करत मेलोनी यांनीही त्यांचे दोन्ही हात वर उचलले. यावर कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी विनोदी शैलीत आपल्या हाताकडे इशारा करत विचारलं, तुम्ही निकोटिन पॅच लावलाय का? यावर लगेच हंशा पिकला. निकोटिन पॅच शरीराच्या त्वचेवर लावला जातो. तो हळूहळू शरीरात अल्प प्रमाणात निकोटिन पोहोचवतो. त्यामुळे सिगारेट, विडी किंवा तंबाखू सोडणाऱ्या लोकांना त्याची तल्लफ कमी जाणवते आणि व्यसन सोडणं सोपं होतं.



मेलोनी यांनी जपानच्या पंतप्रधान साने ताकाइची यांनाही संभाषणात ओढलं आणि म्हणाल्या, तुम्ही माझ्यासोबत माझ्या शेवटच्या सिगारेटपैकी एक सिगारेट ओढली होती! युरोपियन कमिशनच्या प्रमुख उर्सुला लेयेन यांनी युरोपियन युनियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा यांना विचारलं, तुम्हीही सिगारेट ओढता का? यावर त्यांनी नकारार्थी उत्तर दिलं. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी अँटोनियो कोस्टा यांना लगेच डिवचलं, खरंच? तुम्ही सिगारेट कधी सोडली?.. यावर कोस्टा यांनी उत्तर दिलं, २००५ मध्ये मी शेवटची सिगारेट ओढली होती!

परिषदेदरम्यान फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आपलं घड्याळ कुठेतरी विसरले. नेते दुपारच्या जेवणासाठी जात असताना कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी म्हणाले, मॅक्रॉन त्यांचं घड्याळ इथंच विसरून गेले आहेत. यावर डोनाल्ड ट्रम्प तत्काळ म्हणाले, जर त्यांनी ते सोडून दिलं असेल तर मला द्या. त्यांच्या या वक्तव्यानं उपस्थितांमध्ये प्रचंड हंशा पिकला. जी-७ शिखर परिषदेदरम्यान नेत्यांमधल्या या आणि अशा रंजक गप्पा सध्या सोशल मीडियावर बऱ्याच व्हायरल होत आहेत.

## गुरु वचन

### प्रेम स्वातंत्र्याची किंमत नव्हे! : ओशो

आम्हाला सर्व हवे आहे पण आम्हाला प्रेम स्वातंत्र्याच्या किमतीवर नकोय. आपल्याला दोन्ही कसे मिळू शकते? मला माझे स्वातंत्र्य हवे आहे. मी माझ्या प्रेयसीला स्वातंत्र्य देतो पण मला तिचे लक्ष ठेवण्याच्या रुपात दु:ख मिळते. प्रेयसीला स्वातंत्र्य देण्याचा तुमचा विचारच चुकीचा आहे. प्रेयसीला स्वातंत्र्य देणारे तुम्ही कोण आहात? तुम्ही प्रेम करू शकतात व तुमच्या प्रेमात स्वातंत्र्य आहे. ही गोष्ट दुसऱ्याला देण्यासारखी नाही. जर देण्यास आली तर तिच अडचण येईल जिचा तुम्ही सामना करत आहात.

खरंतर तुम्ही स्वातंत्र्य देऊ इच्छित नाही. तुम्हाला वाटेल की, स्वातंत्र्य देण्यासारखी परिस्थितीच निर्माण होऊ नये पण तुम्ही अनेकदा मला प्रेम स्वातंत्र्य देते, हे सांगताना ऐकले असेल म्हणून स्वातंत्र्य देण्यासाठी स्वत:वर दबाव टाकतात कारण तुमचे प्रेम, प्रेम नसते.

तुम्हाला एका अवघड प्रश्नात अडकले आहात. जर तुम्ही स्वातंत्र्य दिले नसते तर तुम्हाला प्रेमावर संशय आला असता. जर तुम्ही इच्छा नसूनही स्वातंत्र्य दिले तर हजार प्रश्न निर्माण होतात. तुम्ही तुमच्या प्रेयसीसाठी पुरेसे नाहीत? की तिला दुसऱ्याची साथ हवी म्हणून तिला स्वातंत्र्य हवे आहे? यामुळे दु:ख होते व तुम्ही विचार करतात की, तुम्ही आपल्यापेक्षा कमी महत्व देतात.

तिला स्वातंत्र्य देऊन तुम्ही इतरास पहिले ठेवले व नंतर स्वत:ला. हे अंहकाराविरुद्ध आहे व यामुळे काही फायदा होणार नाही कारण तुम्ही जे स्वातंत्र्य दिले आहे त्यासाठी तुम्ही बदलणार.

दुसरी गोष्ट म्हणजे जर तुमची प्रेयसी दुसऱ्यासोबत राहिली असेल तर तुम्हाला आपल्या प्रेयसीसोबत राहणे वेगळे वाटेल. यामुळे तुमच्या व तिच्यात अडथळा निर्माण होईल. तिने दुसऱ्याची निवड केली आहे व तुम्हाला सोडून दिले आहे किंवा तिने तुमचा अपमान केला आहे.

व तुम्ही तिला खुप काही दिले आहे, तुम्ही उदार होत आहोत, तुम्ही तिला स्वातंत्र्य दिले आहे. तुम्हाला दुखावल्यासारखे जाणवत आहे म्हणून तुम्ही तिला कुठल्यातरी रुपात दुखवाल.

पण हे सर्व गैरसमजामुळे होते. मी हे म्हणालो नाही की, तुम्ही प्रेम करत असाल तर तुम्हाला स्वातंत्र्य द्यावे लागेल. नाही मी म्हणालो आहे की, प्रेम स्वातंत्र्य आहे. येथे प्रश्न देण्याचा नाही. जे जसे आहे त्याला तसेच राहू द्या. विनाकारण गुंतागूंत का वाढवायची? अगोदरच अनेक अडचणी आहेत.

जर तुमचे प्रेम त्या पातळीपर्यंत आले आहे की, स्वातंत्र्य तिचे अंग बनले आहे तेव्हा तुमच्या प्रेयसीला परवानगी घेण्याची गरजच राहणार नाही. जर मी तुमच्या जागी असतो व माझ्या प्रेयसीने परवागनी मागितली तर मला दु:ख झाले असते. याचा अर्थ तिला म ाझ्या प्रेमावर विश्वास नाही. माझे प्रेम स्वातंत्र्य आहे. मी तिच्यावर प्रेम केले आहे याचा अर्थ असा नव्हे की, मी सर्व मुभा दिली ज्यामुळे ती कुणासोबतही हसू शकेल, कुणासोबतही नृत्य करु शकेल, कुणावर प्रेम करु शकणार नाही कारण आपण कोण आहोत?

आपण कोण आहोत? हा मुळ प्रश्न आहे, जो सर्वांनी केला पाहिजे. आपण सर्व अनोळखी आहोत व या आधारावर आपण सांगू शकतो की, मी तुला स्वातंत्र्य देईल किंवा मी तुला स्वातंत्र्य देणार नाही. जर तु माझ्यावर प्रेम करत असेल तर दुसऱ्यावर प्रेम करू शकत नाही? या सर्व मूर्ख गोष्टी आहे पण या सर्व मानवावर सुरुवातीपासून हावी राहिल्या आहेत व आपण अजूनही असभ्य आहोत. प्रेम काय असते? हे आपणास अजूनही माहित नाही.

जर मी कुणावर प्रेम करत असेल तर मी त्या व्यक्तीप्रती कृतज्ञ असतो की तिने मला प्रेम करू दिले, तिने माझे प्रेम स्वीकारले. हेच पुरेसे आहे. मी तिच्यासाठी कैदखाना बनत नाही. तिने माझ्यावर प्रेम केले व बदल्यात मी तिच्या चहुबाजूस कैदखाना बनवत आहे? मी तिच्यावर प्रेम केले व बदल्यात ती माझ्या चहुबाजूस कैदखाना बनवत आहे? आम्ही एकमेकांना चांगला पुरस्कार देत आहोत.

जर मी कुणावर प्रेम करतो तेव्हा मी तिचा कृतज्ञ असतो व तिचे स्वातंत्र्य कायम असते. मी तिला स्वातंत्र्य दिले नाही. हा तिचा जन्मसिद्ध हक्क आहे.

## पंचांग

२० जून २०२६
शनिवार
विक्रम संवत्– २०८२
निज ज्येष्ठ शके
संवत्– १९४८
संवत्सर – पराभवनाम
अयन– दक्षिणायण
मास– निज ज्येष्ठ
ऋतु – सौर ग्रीष्म
शुक्ल पक्ष
तिथि:षष्टी १५:४६:५५
नक्षत्र:मघा ०९:२५:३०
योग:वज्र १२:४७:४७
करण:तैतिल १५:४६:५५
करण:गर २७:२८:०३+
सूर्य:मिथुन
चन्द्र:सिंह
हिजरी सन् – १४४८
मुस्लिम मास – मोहरम
तारीख – ४
विशेष
अरण्यषष्ठी
विंध्यवासिनी पूजा
चांगदेव महाराज
यात्रा – पुणतांबे
उद्धव महाराज मुंगळेकर
पुण्यतिथी – बिलोली, नांदेड

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९८६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | 1 | | | | |
| | 5 | 9 | | 7 | | | 6 | |
| 3 | | | | 6 | 4 | 5 | 1 | 8 |
| | | 1 | | 2 | | | 8 | 5 |
| 6 | | 4 | | | | 7 | | 1 |
| 5 | 8 | | | 4 | | 2 | | |
| 9 | 3 | 7 | 8 | 5 | | | | 2 |
| | 4 | | | 9 | | 1 | 5 | |
| | | | | 3 | | | | 9 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९८५ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 9 | 1 | 2 | 3 | 5 | 6 | 7 |
| 6 | 5 | 2 | 7 | 8 | 4 | 3 | 9 | 1 |
| 7 | 3 | 1 | 9 | 5 | 6 | 8 | 2 | 4 |
| 2 | 9 | 4 | 6 | 7 | 5 | 1 | 3 | 8 |
| 1 | 7 | 5 | 2 | 3 | 8 | 9 | 4 | 6 |
| 3 | 6 | 8 | 4 | 1 | 9 | 2 | 7 | 5 |
| 4 | 1 | 3 | 5 | 9 | 7 | 6 | 8 | 2 |
| 5 | 8 | 7 | 3 | 6 | 2 | 4 | 1 | 9 |
| 9 | 2 | 6 | 8 | 4 | 1 | 7 | 5 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६३१ – आयर्लंडमधील बाल्टिमोर शहर अल्जिरियाच्या चाच्यांनी लुटले.
- १७८२ – अमेरिकेच्या काँग्रेसने राष्ट्रमुद्रा ठरवली.
- १७८९ – पॅरिसमध्ये सुमारे ५०० लोकप्रतिनिधींनी टेनिस कोर्टवरील शपथ घेतली व फ्रेंच क्रांतीला बळ दिले.
- १७९१ – फ्रेंच क्रांतीत आपले मरण असल्याचे ओळखून फ्रेंच राजघराण्याने व्हारेनला पळ काढण्याचा प्रयत्न सुरू केला.
- १८३७ – व्हिक्टोरिया इंग्लंडच्या राणीपदी.

### राष्ट्रीय

- १८९९ – र.पु. परांजपे केंब्रिज विद्यापीठाचे रँग्लर बनले.
- १९२९ – पुण्यात टिळक म हाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना.
- १९५३ – श्यामप्रसाद मुखजाअना काशषमरमध्ये अटक. दोन दिवसांनी त्यांचे निधन झाले.

### जन्म

- १००५ – अली अझ–झहीर, खलिफाचा जन्म.
- १५६६ – सिगिस्मंड तिसरा, पोलंडच्या राजाचा जन्म.
- १६३४ – चार्ल्स इमॅन्युएल, सव्हॉयच्या राजाचा जन्म.
- १८६० – जॅक वॉराल, ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू, फुटबॉलपटू व प्रशिक्षकाचा जन्म.

### निधन

- ०४५१ – थियोडोरिड, व्हिझिगॉथ राजाचे निधन.
- ०८४० – भक्त लुई, फ्रँक राजाचे निधन.
- १६६८ – हाइनरिक रॉथ, जर्मनीचा संस्कृत भाषाप्रवण याचे निधन.
- १८३७ – विल्यम चौथा, इंग्लंडचा राजाचे निधन.
- १९१७ – जेम्स मेसन क्राफ्टस, अमेरिकन रसायनशास्त्रज्ञाचे निधन.
- १९८७ – पक्षीतज्ज्ञ सलीम अलीचे निधन.

## : SMS :

Buhat Dukh Hoa Tumharay Husband Ke Death Ka.. Chalo Ab Udas Mat Ho, Mein Hon Na. Film Dekhnay Chalatay Hain.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.२ | २४.५ |
| अहमदनगर | ३६.१ | २४.५ |
| अकोला | ४१.४ | २९.८ |
| अमरावती | ४०.९ | २९.३ |
| बीड | ४३.९ | ३३.३ |
| भंडारा | ४३.८ | ३३.३ |
| बुलढाणा | ४२.५ | २९.४ |
| चंद्रपूर | ४३.६ | ३४ |
| चेन्नई | ४३.९ | ३१.५ |
| नवी दिल्ली | ४२.८ | ३२.८ |
| धुळे | ४० | २७.२ |
| गोंदिया | ४१.९ | ३३.५ |
| जळगाव | ४०.८ | २८.७ |
| कोल्हापूर | ३५.१ | २३.८ |
| लातूर | ३७ | २६.६ |
| मुंबई | ३९.२ | ३५.१ |
| नागपूर | ४२.२ | ३२ |
| नांदेड | ४०.१ | २९.७ |
| नंदूरबार | ३६.५ | २६.२ |
| नाशिक | ३५.५ | २५.२ |
| पुणे | ३३.७ | २२.३ |
| पंढरपूर | ३८.१ | २५.९ |
| सातारा | ३५.८ | २३ |
| सांगली | ३६.६ | २४.२ |
| सोलापूर | ३७.९ | २६.३ |
| वर्धा | ४३.२ | ३३.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पश्चिम स्वत:चे मोठेपण व्यवहाराच्या आड येऊ देऊ नका.

**तुळ :** शुभ रंग :हिरवा, शुभ दिशा: उत्तर राहत्या घराचे प्रश्न मात्र लांबणीवर टाकणेच उत्तम. कटकटी कौशल्याने टाळा.

**वृषभ :** शुभ रंग: पांढरा., शुभ दिशा: उत्तर कठीण प्रसंगात अत्यंत उपयुक्त ठरणारे घरातील वृद्ध व वरिष्ठ यांना दुर्लक्षित करू नका.

**वृश्चिक :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: दक्षिण पैशाची अडचण दूर होईल. शेजाऱ्यापाजाऱ्यांचा त्रास कमी होईल.

**मिथुन :** शुभ रंग: गुलाबी: शुभ दिशा: दक्षिण निष्कारण निराशेचे विचार कामासाठीचा वेळ वाढविणारे व वेग कमी करणारे ठरतील.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम राजकारणी, पुढारी, गल्लीतले दादा यांचा थोडाफार त्रास आपल्यापर्यंत येणे शक्य.

**कर्क :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण कलहाचे प्रसंग, होणाऱ्या चुका, वाहनांचा ताबा व बोलण्यातील तोल यावरचे नियंत्रण गमावून बसू नका.

**मकर :** शुभ रंग: लाल : शुभ दिशा: पश्चिम क्षेत्रात भेटणारे वरिष्ठ व अनुभवी यांच्याशी चर्चा यातून पुढील काळासाठीचा नवा कार्य प्रकल्प डोक्यात घोळू लागेल.


**सिंह :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम हितशत्रूंचे कळणारे डावपेच त्यांचे अडथळे दूर करण्यासाठी उपयुक्त ठरतील. पत्रव्यवहार यशस्वी होतील.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण उगाच ग्रासली जाणारी निराशा वेळीच दूर करा. कोणताही प्रश्न केवळ नशिबाने सुटत नसतो हे लक्षात घ्या.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर काही कौटुंबिक प्रश्नात आपली ठाम भूमिका सर्वांनाच त्या प्रश्नातून बाहेर काढणारी ठरेल.

**मीन :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर घरात मौल्यवान वस्तूंची खरेदी लांबणीवर टाकणे उचित ठरेल. मुलांचे यश आनंदात भर घालेल.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९८६



### आडवे शब्द

१. प्राचीन, जुने ४. चूकच्या विरुद्ध, सह ८. धुंदी ९. सन्मानाने केलेली पाठवणी १०. पायापर्यंत लोंबणारा हार १४. पद्धतीनुसार १६. धनुष्याकृती १७. उलटी, ओकारी, २०. हा अगरबत्तीचा असतो आणि पदार्थांतही २१. संधी, मोका २२. कमीत कमी, निदान २५. खिसा गरम ठेवणाऱ्या २६. गोरा ना काळा! २७. धडक २८. छोटी, लहानशी ३२. समोरासमोर ३५. शेवटचा पांडव ३८. स्वयंपाक करणारा ३९. मज्जाव ४०. भरभराट ४२. आवाज, गोंगाट ४३. छोटी विश्रांती ४४. समुदाय ४६. मजबूत, भक्कम ४८. आश्रय ४९. दुलई ५०. पराधीन असणारा जीव ५२. पदर ५४. पद्धत ५५. अभिनेता ५७. केसात माळण्याची फुलांची माळ ५९. आघात, घाव ६०. सुसर ६२. तपस्या ६४. नुकसान, घाटा, ६६. शिक्षक ६७. सूर्याचे एक नाव ६८. अवघा ६९. छिद्रातून पडलेला उन्हाचा किरण ७१. पळसाचा डिंक ७३. आपले राष्ट्रगीत ७५. आणि ७६. इंग्रजीतला मुरांबा, मराठीत खूपच ७७. शेवट ७८. हार, सर ७९. नम्र

### उभे शब्द

१. पूजाअर्चा करणारा २. एक हिंस्त्र प्राणी ३. बाज विणण्याची कापडी पट्टी ४. उद्यान, बाग ५. वस्तूंची यादी ६. झाडाची त्वचा ७. मालक, स्वामी ८. मऊ ११. स्वाभिमानी, बाणेदार १२. भोजनालय १३. अधाशी १५. घोड्याचे घर १६. आईसक्रीमचा एक प्रकार १९. कापसाची बी २०. मनातील इच्छा, आकांक्षा २१. बोकड २२. इंग्रजीत फाटक २३. वडीलांचे मराठी संबोधन २४. शत्रुच्या नाशाचे मंत्रतंत्र २९. जेमतेम ३०. विशेष ३१. अरण्य ३२. विधिमंडळातील लोकप्रतिनिधी ३३. गजऱ्यातील सुगंधी वनस्पती ३४. प्रामाणिक ३६. मावळ्यांची युद्धातील घोषणा ३७. परमेश्वर ३८. जनगणना ४१. पसरट आकाराचे भांडे ४३. भव्य, प्रचंड ४५. खराब ४६. मीठी ४७. कोर्टातील दावा ५१. नम्रतेने मान खाली घालणे ५२. शिकार ५३. लोकनाट्य ५५. हात ५६. व्याकूळ, घाबरलेला ५८. उजाडण्यापूर्वीच ६१. उष्ण ६३. प्रसिद्ध ६५. चंद्रावर ’दिसणारा’ प्राणी ६७. ठराविक पैसे ६८. माल, वस्तू ६९. पंकज ७०. टिमकी ७२. निरोप, सुट्टी ७४. लक्ष्मीचे एक नाव

### जम्बो शब्दकोडे क्र. ९८५ चे उत्तर

आडवे उत्तर १.मी शरण तुला भगवंता ८.पारा १०.खोड ११.नरम १२.लाख १३.बजरंगबली १५.मणका १७.मोका १९.आड २२.कमलाकर २३.तबक २५.बाराखडी २७.चावी २८.बाबत ३०.जब ३२.चव ३३.करवत ३४.ईश्वर ३६.वसन ३९.सकट ४१.राजरोस ४२.टप ४४.राजस ४५.विनवणी ४७.जनता ४९.निलाजरा ५०.वा ५१.खरडपट्टी ५२.माह ५४.तालेवार ५७.पाव ५९.खसखस ६१.डाक ६३.सुरमा ६५. माल ६६.पाक ६७.वारसा ६९.डमडम ७०.परतावा ७१.चक्र ७२.नयन ७४.मन ७५.परागंदा ७७.लगाम ७८.सह ८०.दम ८१.रबरी ८२.मदनबाण ८३.ठो

उभे उत्तर : १.मीन २.शरम ३.रमण ४.तुला ५.लाखमोलाचा ६.गज ७.ताबडतोब ८.पारंगत ९.राग १०.खोली १४.बराक १६.काकडी १८.काकवी २०.अलबत २१.अंबाबाई २४.बळकट २६.खबर २८.बावळट २९.तपास ३०.जवळी जरा ३१.ऐवज ३५.श्वसन ३७.सरोज ३८.नसनखवडा ४०.कफनी ४१.राणी ४३.पदोपदी ४४.राजहट्ट ४५.विजेता ४६.वनवास ४८.तार ४९अ.लामा ५३.पहेलवान ५५.लेखक ५६.रखवालदार ५८.सुर ६०.सर ६२.कडकलक्ष्मी ६३.सुमन ६४.मापन ६५.मातामह ६६.पालुपद ६८.सावकार ७३.यमन ७६.राम ७८. मम ७९.सण

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सिंहगडावर स्वच्छता मोहिम संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीचे औचित्य साधून सारथी संस्थेच्यावतीने सिंहगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सारथीचे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी तसेच सारथी पुणे विभागीय कार्यालयाचे उपव्यवस्थापकीय संचालक अनिल पवार व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मोहिमेदरम्यान किल्ल्यावरील प्लास्टिक व इतर घनकचरा संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला. ऐतिहासिक वारशाचे जतन, गड-किल्ल्यांचे संवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत ऐतिहासिक व पर्यावरणीय संवर्धनासाठी योगदान देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. सहभागी विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला, अशी माहिती सारथी विभागीय कार्यालयाच्यावतीने देण्यात आली आहे.

### कात्रज चौक ते राजस सोसायटी मार्गावरील वाहतुकीत बदल

पुणे (दैनिक संध्या) : कात्रज चौक ते राजस सोसायटी दरम्यान सुरू असलेल्या सहापदरी उड्डाण पुलाच्या सेगमेंटल लाँचिंग कामामुळे या मार्गावरील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आल्याबाबतचे आदेश पोलीस उपायुक्त (वाहतूक) डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी जारी केले. कोंढवा ते कात्रज येथे जाणाऱ्या वाहनांनी राजस पुलाऐवजी सेवा रस्त्याचा वापर करावा. राजस पुलावर केवळ कात्रज ते कोंढवा दिशेने एकेरी वाहतूक सुरू राहील. कात्रज तलावाकडून येणाऱ्या वाहनांनी सेवा रस्तमार्गे राजस पुलावरून कोंढव्याकडे जावे. तसेच राजस सोसायटीकडून कात्रजकडे जाणाऱ्या वाहनांनी कपिला डेअरी येथे वळून (यु-टर्न) घेऊन पुढे जावे. अत्यावश्यक सेवांतील वाहने वगळता सर्व वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करून वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. भाजीभाकरे यांनी केले आहे.

### नशामुक्त भारत अभियानांतर्गत येरवडा येथे जनजागृती कार्यक्रम संपन्न

■ व्यसनमुक्त राहा, शिक्षणाला प्राधान्य द्या – समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे

पुणे (दैनिक संध्या) : दारु व अंमली पदार्थांसह समाज माध्यमांचेही व्यसन घातक असून यामुळे विद्यार्थ्यांनी अशा व्यसनांपासून दूर राहावे, येत्या काळात भारत देशाला महासत्ता म्हणून उदयास येण्याकरिता तरुण पिढीसह विद्यार्थ्यांचे मोठे योगदान आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक प्रगती करावी, असे आवाहन राज्याच्या समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे यांनी यांनी केले. नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत आंतरराष्ट्रीय मादक पदार्थाचा गैरवापर व अवैध तस्करी विरोधी दिनानिमित्त सफाई कामगारांच्या मुला-मुलींची शासकीय निवासी शाळा, येरवडा येथे जनजागृती कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे उपस्थित होत्या. यावेळी प्रादेशिक उपआयुक्त वंदना कोचुरे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राधाकिसन देवढे, सहायक आयुक्त (व्यसनमुक्ती) मिना आंबाडेकर तसेच डॉ. विजय मोरे यांच्यासह सुमारे २०० विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. वाढती व्यसनाधीनतेचे प्रमाण, त्याचे शारिरीक व आर्थिक दुष्परिणाम तसेच व्यसनांपासून दूर राहण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले, अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी राधाकिशन देवढे यांनी दिली.

### आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पुणे जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, सेवाभावी शैक्षणिक संस्था, क्रीडा संकुले, क्रीडा मंडळे, क्रीडा संघटना, युवक मंडळे, महिला मंडळे तसेच क्रीडा क्षेत्रात कार्यरत संस्थांनी अधिकाधिक लोकसहभागासह आंतरराष्ट्रीय योग दिनाचे कार्यक्रमाचे आयोजन करावे, २१ जून २०२६ रोजी सकाळी ७ ते ७.४५ या वेळेत अधिकृत सामूहिक योग प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच स्थानिक गरजेनुसार इतर योग व तंदुरुस्तीविषयक उपक्रमांचे आयोजन करून नागरिकांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सन २०१९ मध्ये सुरू केलेल्या 'फिट इंडिया मूव्हमेंट'चा उद्देश प्रत्येक नागरिकाने तंदुरुस्तीचा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकार करावा हा आहे. या संकल्पनेच्या अनुषंगाने देशभर योग व विविध शारीरिक तंदुरुस्तीच्या उपक्रमांद्वारे नागरिकांना नियमित व्यायामासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे.दरवर्षी २१ जून रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय योग दिन हा योगाला सर्वांगीण आरोग्य व कल्याणासाठी जीवनपद्धती म्हणून प्रोत्साहन देणारा उपक्रम आहे. यावर्षीच्या १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची अधिकृत संकल्पना "निरोगी वृद्धत्वासाठी योग"अशी आहे. योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांची माहिती, छायाचित्रे, पेपर कात्रणे, सहभागी युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्य नागरिकांची संख्या आदींचा सविस्तर अहवाल कार्यक्रमानंतर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या dsopune6@gmail.com या ई-मेलवर पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### आंतरराष्ट्रीय योग दिनाचे स. प. महाविद्यालय मैदान येथे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिका व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून २०२६ रोजी स. प. महाविद्यालय मैदान, पुणे येथे 'आंतरराष्ट्रीय योग दिन'आयोजन करण्यात येणार आहे. सकाळी ६ वाजता उपस्थिती नोंदणी होणार असून सकाळी ७ ते ७.४५ या वेळेत सामूहिक योग सत्र होणार आहेत. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या दिनात सहभागी होऊन आंतरराष्ट्रीय योग दिन यशस्वी करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.

### शासकीय मुलींच्या वसतिगृहाचे प्रवेश सुरु

पुणे (दैनिक संध्या) : राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत येरवडा येथील 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृह' येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इयत्ता अकरावी आणि बारावीच्या शाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी या वसतिगृहात प्रवेश दिला जाणार आहे. मागासवर्गीय आणि गरजू विद्यार्थिनींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. या वसतिगृहाची क्षमता ८५ विद्यार्थिनींची असून, अकरावी आणि बारावीच्या कोणत्याही शाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींना येथे प्रवेश मिळू शकतो.

# पुरंदर विमानतळ प्रकल्पग्रस्तांसाठी २२ जून रोजी विशेष कॅम्प

**न्यायिक, अर्धन्यायिक व महसुली प्रकरणांचा जागेवर निपटारा**

**जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष उपक्रम**

**७५ टक्के शेतकऱ्यांचे प्रतिज्ञापत्र सादर**

**जवळपास एक हजार कोटी रुपयांचे वाटप**

पुणे (दै. संध्या)

प्रस्तावित छत्रपती संभाजी राजे आंतरराष्ट्रीय विमानतळ (पुरंदर) प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या महसुली, न्यायिक आणि अर्धन्यायिक स्वरूपाच्या प्रलंबित अडचणी सोडविण्यासाठी २२ जून रोजी सकाळी ११ वाजता सासवड प्रांत कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला आहे.

या कॅम्पमध्ये प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन जागेवरच निपटारा करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. आतापर्यंत सुमारे ७५ टक्के शेतकऱ्यांनी



प्रतिज्ञापत्रे (ॲफिडेव्हिट) सादर केली असून जवळपास एक हजार कोटी रुपयांच्या मोबदल्याचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांपर्यंत मोबदल्याची रक्कम तातडीने पोहोचावी, यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे.

जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी सांगितले की, अनेक प्रकरणांमध्ये वारस नोंदी, फेरफार मंजुरी, सातबारा उताऱ्यातील त्रुटी, नाव दुरुस्ती, हक्कसोडपत्र, संयुक्त मालकीचे प्रश्न, मयत खातेदारांच्या नोंदी, मालकी हक्क पडताळणी, मूल्यांकनावरील हरकती, न्यायालयीन दावे तसेच विविध अर्धन्यायिक प्रकरणांमुळे मोबदला वितरणात अडथळे निर्माण होत आहेत.

या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी महसूल, भूमी अभिलेख, प्रांत कार्यालय, तहसील कार्यालय आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी कॅम्पमध्ये उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना विविध कार्यालयांचे फेरे मारण्याची आवश्यकता राहणार नाही.

"अनेक शेतकऱ्यांच्या अडचणी या महसुली किंवा कागदोपत्री स्वरूपाच्या आहेत. त्या वेळेत दूर झाल्यास मोबदला वितरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण होऊ शकते. मात्र प्रकरणे न्यायालयात गेल्यास संबंधित रक्कम दीर्घकाळ प्रलंबित राहण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी प्रशासनासमोर मांडून विशेष कॅम्पचा लाभ घ्यावा," असे जिल्हाधिकारी डुडी यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, न्यायिक आणि अर्धन्यायिक प्रकरणांमध्ये अनेक स्तरांवरील प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. परिणामी अशा प्रकरणांचा अंतिम निपटारा होईपर्यंत संबंधित लाभार्थ्यांना मोबदला मिळण्यास विलंब होऊ शकतो. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना वेळेत लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने हा विशेष उपक्रम राबविला आहे.

या विशेष कॅम्पमध्ये जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी स्वतः उपस्थित राहून प्रकरणांचा आढावा घेणार असून आवश्यक त्या प्रकरणांमध्ये तातडीने निर्णय घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देणार आहेत. प्रकल्पग्रस्तांनी सातबारा उतारा, आठ-अ, आधार कार्ड, पॅन कार्ड, वारस नोंदी, हक्कसोडपत्र, फेरफार अर्ज, न्यायालयीन कागदपत्रे तसेच इतर आवश्यक दस्तऐवजांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या सर्व प्रलंबित समस्या शक्य तितक्या वेगाने निकाली काढून त्यांना त्यांच्या हक्काचा मोबदला मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी स्पष्ट केले.




## लेखापरीक्षक, वित्तीय रिपोर्टिंग संस्थांनी परस्परपूरक काम करण्याची गरज

पुणे (दै. संध्या)

■ नितीन गुप्ता यांचे प्रतिपादन

डिजिटल आणि AI च्या युगात लेखापरीक्षणाची जबाबदारी वाढली आहे. त्यामुळे लेखापरीक्षण प्रक्रियेतील गुणवत्ता आणि दर्जा टिकवण्या साठी राष्ट्रीय वित्तीय रिपोर्टिंग प्राधिकरण आणि भारतीय सनदी लेखाकार संस्थान (आयसीएआय) यांनी परस्परपूरक काम केले पाहिजे. त्यामुळे विकसित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याची प्रक्रिया गतिमान होईल आणि देशातील वित्तीय अहवाल प्रणाली अधिक सक्षम होतील," असे प्रतिपादन राष्ट्रीय वित्तीय रिपोर्टिंग प्राधिकरण (एनएफआरआय) अध्यक्ष नितीन गुप्ता यांनी केले.

## 'ओरिजिन फ्रेश'ची पश्चिम भारतातील वाढत्या बाजारपेठेवर नजर

पुणे (दै. संध्या)

भारतातील प्रीमियम ताज्या फळभाज्यांच्या क्षेत्रातील अग्रगण्य ब्रँड 'ओरिजिन फ्रेश'ने पुण्यातील कोरेगाव पार्क येथे पहिले स्टोअर सुरू करून पश्चिम भारतातील विस्ताराच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. बंगळुरू येथे मुख्यालय असलेल्या कंपनीसाठी हा विस्तार महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. प्रत्यक्ष स्टोअर्स, स्वतःचे ॲप आणि संकेतस्थळ तसेच क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून कंपनी 'ओम्नीचॅनल' व्यवसाय मॉडेलवर कार्यरत आहे.

दर्जा, ताजेपणा आणि विचारपूर्वक खाद्यपदार्थांची निवड करण्यास प्राधान्य देणाऱ्या ग्राहकांवर लक्ष केंद्रित करण्याच्या कंपनीच्या धोरणाचा भाग म्हणून कोरेगाव पार्कची निवड करण्यात




आली आहे. गतिमान जीवनशैली, जागतिक दृष्टीकोन आणि विकसित होत असलेल्या खाद्यसंस्कृतीसाठी ओळखला जाणारा हा परिसर 'ओरिजिन फ्रेश'च्या गुणवत्ता-केंद्रित दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

"ओरिजिन फ्रेश' च्या या रोमांचक नवीन वाटचालीसाठी मी संपूर्ण टीमला खूप खूप शुभेच्छा देतो. 'ओरिजिन फ्रेश' द्वारे मिळणारी गुणवत्ता, ताजेपणा आणि सोय पुणेकर नक्कीच पसंत करतील, याची मला खात्री आहे. शेतकरी वर्गाला आधार देत असतानाच ताजी फळे आणि भाज्या अधिक सहजपणे उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करणारा हा ब्रँड पाहणे उत्साहवर्धक आहे. 'ओरिजिन फ्रेश' चा पुणे आणि मुंबईमध्ये विस्तार व्हावा आणि अधिकाधिक कुटुंबांना ताजी व जबाबदारीने मिळवलेली उत्पादने घेता यावीत, अशी मी अपेक्षा करतो," असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) सरचिटणीस श्री. रणजित श्रीकांत शिरोळे यांनी स्टोअरच्या उद्घाटनावेळी सांगितले.

या नव्या स्टोअरमध्ये २५० हून अधिक प्रकारची फळे, भाज्या आणि दैनंदिन गरजेच्या वस्तू (एसकेयू) उपलब्ध आहेत. यामध्ये देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय शेतकरी भागीदारांकडून मिळणाऱ्या १५० हून अधिक विशेष आणि विदेशी उत्पादनांचा समावेश आहे. यांतील निवडक उत्पादनांमध्ये कोरियन पिअर्स, जपानी सन फुजी सफरचंद, कॉटन कँडी द्राक्षे, यलो ड्रॅगन फ्रूट आणि हायड्रोपोनिक पद्धतीने पिकवलेले लेट्यूस यांसारख्या उत्पादनांचा समावेश आहे. जागतिक रूची, आरोग्यदायी जीवनशैली आणि दर्जेदार घटकांवर आधारित खाद्यपदार्थांची वाढती मागणी लक्षात घेऊन ही उत्पादने आहेत.

'ओरिजिन फ्रेश'चे सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) प्रशांत वासन म्हणाले, "पुणे हे आमच्या विकास प्रवासातील एक महत्त्वाचे पाऊल आहे. दर्जेदार, अस्सल आणि आरोग्यदायी अन्नपदार्थांना प्राधान्य देणारा ग्राहकवर्ग असलेले हे शहर आहे.

## "संघटन मजबूत करा, जनतेचा विश्वास जपा" – आमदार शेखर निकम

संगमेश्वर (दै. संध्या)

धामापूर जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजितदादा गट) कार्यकर्त्यांचा मेळावा सरंद येथे आमदार शेखर निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांनंतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधणे, विकासकामांचा आढावा घेणे तसेच बदलत्या राजकीय परिस्थितीची माहिती देणे या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आमदार शेखर निकम यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले की, पक्षाची खरी ताकद ही तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये असते. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांच्या समस्या जाणून घेणे



आणि त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे हीच खरी लोकसेवा आहे. विकासकामे ही केवळ कागदावर न राहता ती प्रत्येक गावापर्यंत आणि प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजेत, यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

बदलत्या राजकीय परिस्थितीत संयम, शिस्त आणि संघटनात्मक बांधिलकी यांचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी कार्यकर्त्यांना जनतेशी अधिक संवाद साधण्याचा सल्ला दिला. आगामी काळात पक्षाची विचारधारा आणि विकासाची भूमिका घराघरांत पोहोचवून जनतेचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी सर्वांनी सज्ज राहावे, असेही ते म्हणाले. मेळाव्यात विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला. तसेच स्थानिक प्रश्न, जनतेच्या अपेक्षा आणि पक्ष संघटना बळकट करण्याबाबत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपली मते मांडली. उपस्थित कार्यकर्त्यांनी पक्ष नेतृत्वावरील विश्वास व्यक्त करत आगामी काळात अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या मेळाव्यास राजेंद्र पोमेंडकर (संगमेश्वर तालुकाध्यक्ष), अजय बिरवटकर (जिल्हा परिषद सदस्य), सुशील भायजे (जिल्हा परिषद सदस्य), प्रिया सुवरे (पंचायत समिती सदस्य), दीपक जाधव (माजी पंचायत समिती सदस्य), नाना कांगणे (माजी पंचायत समिती सदस्य), जाकीर शेखासन (अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष), गणपत चव्हाण, तुकाराम मिस्त्री, उमेश महाडिक, सुबोध चव्हाण, शेखर उकर्डे, कृष्णा जोगले, प्रकाश वीर, शांताराम भायजे, निलेश भुवड, सुलतान कापडी, कमर सावंत, अमर जाधव, विष्णू मांडवकर, लहू सुर्वे, दीपक शिगवण, बाबू कवळकर, गंगाराम भायजे, प्रवीण गोमाने, पांडुरंग येलोंढे, आर. के. बाचिम, संतोश गोटेकर, रूपेश गोथाड यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुल होत नसल्याच्या छळातून संगणक अभियंता तरुणीने संपविले जीवन

पुणे (दै. संध्या)

■ पती, सासूसह नातेवाइकांविरुद्ध गुन्हा

मुल होत नसल्याने सासरच्यांकडून छळ होत असल्याने संगणक अभियंता तरुणीने तिसऱ्या मजल्यावरून उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना सिंहगड रस्ता परिसरात घडली. संगणक अभियंता तरुणीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पती, सासू, तसेच नातेवाइकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दीप्ती प्रदीप एकशिंगे (वय-२७, रा. माणिकबाग, सिंहगड रस्ता) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव असून याबाबत दीप्ती चे भाऊ डॉ. किरण तुषार दूधबळे (वय ३०, रा. चामोर्शी, जि. गडचिरोली) यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिचे पती प्रदीप विठ्ठल एकशिंगे, सासू सुरेखा, तसेच नातेवाइकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दीप्ती मूळची गडचिरोली जिल्ह्यातील चार्मोशी गावची रहिवासी असून तिचे पती प्रदीप संगणक अभियंता आहेत. दीप्ती देखील संगणक अभियंता असून एका माहिती-तंत्रज्ञान कंपनीत काम करताना दीप्ती व प्रदीप यांची ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले व त्यांनी १७ नोव्हेंबर २०२४ रोजी पुण्यात प्रेमविवाह केला. मात्र, विवाहानंतर मुलं होत नसल्याने पती, सासू, तसेच नातेवाइकांकडून दीप्तीचा छळ सुरू करण्यात आला. तिला टोमणे मारण्यात आले. छळामुळे तिने १७ जून रोजी इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली, असे फिर्यादीत म्हटले आहे.

# कॅन्सर हीलर सेंटरचे पुण्यात नवीन केंद्र सुरू

**देशातील ३०वे आणि महाराष्ट्रातील ५वे केंद्र**

पुणे (दै. संध्या)

■ पुणे केंद्राच्या माध्यमातून कॅन्सर हीलर सेंटरचे पुणे व आसपासच्या रुग्णांना वेळेवर कॅन्सर सल्लामसलत, प्रारंभिक मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण उपचार सहाय्य उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट

महाराष्ट्रात कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेता, कॅन्सर हीलर सेंटरने पुण्यात आपल्या नवीन केंद्राचे उद्घाटन केले आहे. हे केंद्र देशातील ३०वे आणि महाराष्ट्रातील ५वे केंद्र आहे. या केंद्राच्या उद्घाटनानिमित्त पुण्यात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी संस्थेने वेळेवर सल्लामसलत, कॅन्सरच्या लवकर निदानाबाबत जनजागृती आणि महानगरांबाहेरील भागांमध्ये रुग्णकेंद्रित कॅन्सर उपचारसेवेची गरज अधोरेखित केली.

ICMR-NCDIR च्या महाराष्ट्र कॅन्सर प्रोफाइलनुसार, २०२६ मध्ये राज्यात १.३० लाखांहून अधिक नवीन कॅन्सर रुग्णांची नोंद होण्याचा अंदाज आहे. यामध्ये पुरुषांमध्ये ६१,७०३ आणि महिलांमध्ये ६८,७६२ रुग्णांचा समावेश आहे. या अहवालात तंबाखूचे सेवन, दुय्यम धूम्रपानाचा संपर्क, लठ्ठपणा आणि जीवनशैलीशी संबंधित आरोग्य जोखमी हे कॅन्सरशी संबंधित प्रमुख घटक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी सहज उपलब्ध कॅन्सर मार्गदर्शन, वेळेवर निदान आणि सातत्यपूर्ण उपचार सहाय्य अधिक महत्त्वाचे ठरत आहे.




नवीन पुणे केंद्राची स्थापना विशेष कॅन्सर सल्लामसलत, वैयक्तिक उपचार नियोजन, उपचारानंतरचे फॉलो-अप सहाय्य आणि रुग्णांसाठी संरचित मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात आली आहे. विशेषतः उपचारांबाबत महत्त्वाचे निर्णय घेताना रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना तज्ज्ञांचे मत सहज उपलब्ध व्हावे, अनावश्यक प्रवास टाळावा आणि उपचारांमधील विलंब कमी व्हावा, हा या केंद्राचा उद्देश आहे.

पत्रकार परिषदेदरम्यान, कॅन्सर हीलर सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. तरंग कृष्ण यांनी कॅन्सर जागरूकता, लवकर निदान आणि सातत्यपूर्ण रुग्ण सहाय्य यांच्या महत्त्वावर माध्यमांशी संवाद साधला. तसेच रुग्णांना त्यांच्या घराजवळ वेळेवर वैद्यकीय मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रादेशिक स्तरावर कॅन्सर उपचारसेवा अधिक सक्षम करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

कॅन्सर हीलर सेंटर कॅन्सर उपचारासाठी 'इम्युनोलॉजी-आधारित' दृष्टिकोनाचा अवलंब करते. यामध्ये प्रत्येक रुग्णाची आजाराची स्थिती, रोगप्रतिकारक शक्ती, वैद्यकीय इतिहास, उपचारांना मिळणारा प्रतिसाद आणि एकूण जीवनमान यांचा सखोल विचार केला जातो. पुणे केंद्र रुग्णांना वैयक्तिक उपचार आराखडा, नियमित निरीक्षण आणि उपचाराच्या विविध टप्प्यांमध्ये संवेदनशील फॉलो-अप सहाय्य प्रदान करेल.

यावेळी बोलताना कॅन्सर हीलर सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. तरंग कृष्ण म्हणाले, "महाराष्ट्रातील वाढता कॅन्सरचा भार हे स्पष्ट करतो की रुग्णांना वेळेवर मार्गदर्शन, सुरुवातीपासूनच स्पष्ट माहिती आणि सातत्यपूर्ण उपचार सहाय्याची आवश्यकता आहे. अनेक वेळा रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांचा मौल्यवान वेळ लक्षणे, निदान, उपचारांचे पर्याय किंवा अहवालांनंतरची पुढील दिशा याबाबतच्या संभ्रमामुळे वाया जातो. पुणे केंद्राच्या माध्यमातून आम्ही रुग्णकेंद्रित, संरचित आणि इम्युनोलॉजी-आधारित कॅन्सर सेवा लोकांपर्यंत अधिक जवळून पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहोत. हे उद्घाटन केवळ विस्ताराचा टप्पा नसून पुणे आणि आसपासच्या भागातील रुग्णांसाठी सल्लामसलत, जनजागृती आणि फॉलो-अप सहाय्य अधिक सुलभ करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे."

पुणे केंद्र कॅन्सरच्या प्रारंभिक लक्षणांबाबत जागरूकता वाढवणे, वेळेवर वैद्यकीय हस्तक्षेपाचे महत्त्व अधोरेखित करणे आणि नियमित फॉलो-अपची गरज याविषयी जनजागृती करण्यासाठीही योगदान देणार आहे. संस्थेचा विश्वास आहे की योग्य वेळी सल्लामसलत आणि उपचार मार्गदर्शन उपलब्ध झाल्यास रुग्ण अधिक माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकतात आणि उपचार प्रक्रियेमधील विलंब कमी होऊ शकतो. या नवीन केंद्राच्या उद्घाटनासह, कॅन्सर हीलर सेंटरने महाराष्ट्रातील आपली उपस्थिती अधिक मजबूत केली असून, देशभरातील रुग्णांसाठी कॅन्सर उपचार अधिक सुलभ, वैयक्तिक आणि सातत्यपूर्ण करण्याच्या आपल्या ध्येयाला पुढे नेले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाच्या टीमने घेतली महापौर रवि लांडगे यांची भेट

पिंपरी (दैनिक संध्या) : अभिनेत्री तथा खासदार कंगना रानौत निर्मित "भारत भाग्य विधाता" हा हिंदी चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला असून, या चित्रपटाचे दिग्दर्शक मनोज तापडिया,चित्रपट निर्मात्या बबीता अशीश्वाल तसेच अभिनेत्री गिरिजा ओक आणि स्मिता तांबे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांची आज सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान चित्रपटाच्या निर्मितीमागील संकल्पना, कथानक आणि समाजाभिमुख विषयांबाबत चर्चा करण्यात आली. महापौर रवि लांडगे यांनी चित्रपटाच्या यशासाठी शुभेच्छा देत चित्रपटाच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. यावेळी महा मेट्रो पीसीएमसीच्या ब्रँड ॲम्बेसेडर संगीता तरडे तसेच जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले, 'चित्रपट हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. 'भारत भाग्य विधाता'सारखे चित्रपट समाजात सकारात्मक विचार रुजविण्याचे कार्य करतात. अशा आशयघन आणि प्रेरणादायी चित्रपटांच्या माध्यमातून देशभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय मूल्यांचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचतो. चित्रपटाच्या संपूर्ण टीमला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.'




## सुर्वे यांनी आपल्या कवितेने मराठीला शुद्ध आणि समृद्ध केले! - डॉ. श्रीपाल सबनीस

पिंपरी (दैनिक संध्या) : 'कविवर्य नारायण सुर्वे यांनी आपल्या कवितेने मराठीला बळ प्रदान करून तिला शुद्ध आणि समृद्ध केले!' असे विचार ८९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी खिंवसरा पाटील शिक्षण संकुल, गणेशनगर, थेरगाव येथे गुरुवार, दिनांक १८ जून २०२६ रोजी व्यक्त केले. पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीच्या वतीने ज्येष्ठ समाजसुधारक पद्मश्री गिरीश प्रभुणे यांना पद्मश्री नारायण सुर्वे जीवनगौरव सन्मान प्रदान करून गौरविताना डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. याप्रसंगी पद्मश्री नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे अध्यक्ष सुदाम भोरे, क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती कार्यवाह ॲड. सतीश गोरडे, डॉ. पांडुरंग भोसले, शाहीर आसराम कसबे, महेंद्र भारती, प्रभारी मुख्याध्यापिका सुनीता घोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील प्रा. राजेंद्र कांकरिया यांच्या सहधर्मचारिणी छाया कांकरिया (मास्तरांची सावली कृष्णाबाई नारायण सुर्वे सन्मान), कुष्ठरुग्ण सेवक दत्तात्रय अत्रे (पद्मश्री नारायण सुर्वे भला माणूस पुरस्कार), कवयित्री जयश्री श्रीखंडे (पद्मश्री नारायण सुर्वे जन्मशताब्दी सन्मान), कवी शिवाजी शिंदे आणि कवयित्री प्राजक्ता पटवर्धन (पद्मश्री नारायण सुर्वे साहित्य पुरस्कार) यांना प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

## नागरिकांच्या तक्रारींवर तत्पर कार्यवाहीला प्राधान्य द्या : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांमध्ये दररोज मोठ्या संख्येने नागरिक विविध कामानिमित्त येत असतात. नागरिकांचे म्हणणे संवेदनशीलतेने व संयमाने ऐकून त्यांच्या तक्रारी, सूचना आणि मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सर्व विभागप्रमुख आणि अधिकाऱ्यांना दिले आहेत. महानगरपालिकेत नागरिकांच्या तक्रारी, सूचना तसेच विविध विषयांबाबत प्रत्यक्ष संवाद साधण्यासाठी दर मंगळवार व गुरुवारी दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत नागरिक भेटीचे आयोजन करण्यात येते. या कालावधीत विविध विभागांशी संबंधित प्रश्न मांडण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने आयुक्त कार्यालयात उपस्थित राहतात. मात्र, नागरिकांची वाढती संख्या आणि त्याचवेळी अनेकदा अचानकपणे येणाऱ्या राज्य व केंद्र शासनाच्या महत्त्वपूर्ण बैठका तसेच स्थानिक स्तरावरील अत्यावश्यक बैठका यांमुळे प्रत्येक नागरिकाला अपेक्षित वेळ देणे अनेकदा शक्य होत नाही. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपले प्रश्न, तक्रारी आणि मागण्या प्रथम संबंधित विभागप्रमुखांकडे मांडाव्यात, असे आवाहन आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी केले आहे.

## तळेगाव आठवडे बाजारात बेशिस्तीचा कहर; रस्त्यावर अतिक्रमणामुळे वाहतूककोंडी

तळेगाव दाभाडे (दैनिक संध्या) : तळेगाव दाभाडे येथे दर रविवारी आठवडे बाजार भरतो. परंतु, या बाजारावर स्थानिक प्रशासनाचे नियंत्रण नसल्याने व्यावसायिक भररस्त्यात दुकाने थाटत आहेत. यामुळे वाहनांना व नागरिकांना प्रवास करण्यासाठी रस्ता अरुंद राहत असल्याने वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. आशा बेशिस्त बाजाराला शिस्त कधी आणि कोण लावणार, असा प्रश्न नागरिक करत आहेत. या बाजारामुळे नगर परिषदेच्या कार्यपद्धतीबाबत नकारात्मक भावना निर्माण होत आहे. आठवडे बाजारामध्ये जिजामाता चौक ते हिंदमाता भुयारी मार्ग या परिसरात भाजी विक्रेते तसेच इतर विक्रेते मोठ्या प्रमाणात रस्त्यावर अतिक्रमण करून दुकाने थाटून बसतात. तसेच बाजारासाठी येणारे नागरिक आपली वाहने रस्त्यात व दुकानासमोर बेशिस्तपणे पार्क करतात. या सर्व कारणांमुळे संबंधित परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी निर्माण होत असून, पादचारी नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला व विद्यार्थी यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे वाहतुकीच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत.



# पिंपरी-चिंचवड महापालिकेत १० क्षेत्रीय कार्यालयांची पुनर्रचना; १ जुलैपासून नवे आदेश लागू

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आठऐवजी दहा क्षेत्रीय कार्यालयांचे कामकाज स्वतंत्रपणे 1 जुलैपासून सुरू करण्यात येणार आहे. नवीन ल आणि ज क्षेत्रीय कार्यालयासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्या दोन नवीन कार्यालयात आवश्यक दालने, कार्यालय, सभागृह व इतर व्यवस्था करून घेण्याचे आदेश आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना बुधवारी (दि. 17) दिले आहेत.

सत्ताधारी भाजपने शहरातील आठ क्षेत्रीय कार्यालयांची संख्या वाढवून दहा केली आहे. सर्व दहा ठिकाणी भाजपचे नगरसेवक अध्यक्ष होतील, अशा प्रकारे सत्ताधाऱ्यांनी आठही क्षेत्रीय कार्यालयांची फोडाफोडी केली आहे. विरोधकांचा प्रचंड विरोध डावलून महापालिकेच्या 13 मार्चच्या सर्वसाधारण सभेत सत्ताधाऱ्यांनी ती उपसूचना मंजूर केली. तर, ती उपसूचना सुसंगत नसून, रद्द न केल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा विरोधकांनी 15 मे रोजीच्या सर्वसाधारण सभेत दिला होता. त्यामुळे सत्ताधाऱ्यांवर जुनी उपसूचना रद्द करण्याची नामुष्की ओढवली. तर, आयुक्तांनाही दहा क्षेत्रीय कार्यालयांचे कामकाज 25 मे रोजीपासून सुरू करण्याचा 13 मे रोजी दिलेला आदेशही माघारी घ्यावा लागला होता. त्याच सभेत सत्ताधाऱ्यांनी पुन्हा आठऐवजी दहा क्षेत्रीय कार्यालय स्थापन करण्याची सूचना मंजुरी केली होती. त्या उपसूचनेवर आयुक्तांनी



वरील आदेश आज काढले आहेत.

क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त अतुल पाटील यांच्याकडे ल क्षेत्रीय कार्यालयाचे तर, ड क्षेत्रीय कार्यालयाच्या सहायक आयुक्त अश्विनी गायकवाड यांच्याकडे ज क्षेत्रीय कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. कार्यकारी अभियंता सुनीलदत्त नरोटे यांची क क्षेत्रीय कार्यालय येथून ल क्षेत्रीय कार्यालयात नियुक्ती करण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता सुनील शिंदे यांची ई क्षेत्रीय कार्यालयातून ज क्षेत्रीय कार्यालयात नियुक्ती करण्यात आली आहे.

### मनुष्यबळाची विभागणी होणार

महापालिकेची शहरात आठ क्षेत्रीय कार्यालये आहेत. महापालिकेच्या स्वतःच्या इमारती नसल्याने आयटीआय तसेच, प्राधिकरणाच्या इमारतींमध्ये काही कार्यालये सुरू आहेत. दोनने संख्या वाढवून, दहा क्षेत्रीय कार्यालय केल्यास क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रफळ घटणार आहे. त्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांची सर्व दहा क्षेत्रीय कार्यालयांत विभागणी केली जाणार आहे. तसेच, आवश्यकतेनुसार मनुष्यबळ वाढवले जाणार आहे. सध्या आठ सहाय्यक आयुक्त म्हणजेच क्षेत्रीय अधिकारी आहेत. आणखी दोन सहाय्यक आयुक्त नेमावे लागतील.

नवीन क्षेत्रीय कार्यालये 1 जुलैपासून सुरू करण्यासाठी मध्यवर्ती भांडार, स्थापत्य, विद्युत, माहिती तंत्रज्ञान, पाणीपुरवठा, आरोग्य आणि अग्निशमन विभागांना आवश्यक सुविधा देवून काम करून घेण्याच्या त्या अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. कार्यालयांमध्ये फर्निचर, इंटरनेट, सीसीटीव्ही, वीजपुरवठा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छता आणि अग्निसुरक्षा व्यवस्था तातडीने उभारण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

## महापालिका भवनावर खासगीकरणाच्या दुकानाचा फलक लावा – चेतन पवार

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दुकानातील आरक्षित भूखंड भाडेतत्त्वावर देत आहोत असा फलक महापालिका भवनावर लावावा, तसेच ज्या संस्थेला व ज्या मोठ्या कारभाऱ्यांना याचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी त्वरित लाभ घ्यावा, असेही आवाहन आयुक्त यांनी करावे अशी उपरोधित टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख चेतन पवार यांनी केली.




पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि शिक्षण विभागात असणारा भ्रष्टाचार आणि भोंगळ कारभाराबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने वेळोवेळी आयुक्तांकडे तक्रार केली आहे. परंतु झोपेचे सोंग घेतलेल्या या प्रशासनाला जागे करण्यासाठी गुरुवारी जागर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

या मोर्चानंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना चेतन पवार यांनी सांगितले की, पुनावळे येथील मनपा शाळेसाठी आरक्षित भूखंड खाजगी संस्थेला देऊ नये. तिथे गोरगरिबांच्या मुलांसाठी मनपाने शाळा सुरू करावी. या मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने अनेक वेळा आयुक्तांना पत्र देऊन, पत्रकार परिषद घेऊन देखील विरोध दर्शविण्यात आला होता. तरी देखील सोमवारी सर्वसाधारण सभेत तुटपुंज्या रकमेवर ९१ गुंठ्यांचा हा आरक्षित भूखंड ३० वर्षाच्या मुदतीवर नाममात्र भाडेकराराने देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. याला राष्ट्रवादी काँग्रेसने विरोधी पक्ष म्हणून सभागृहात विरोध करायला हवा होता. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा भाजपची बी टीम असल्याने त्यांनी विरोध केला नाही आणि बहुमताच्या जोरावर या प्रशासनाने ठराव मंजूर केला. यासाठी कोणत्या आमदारांचा, वरिष्ठांचा दबाव होता हे आयुक्तांनी जाहीर करावे आणि या मनपा हद्दीतील उर्वरित सर्व भूखंड देखील मोठ्या कारभाऱ्यांना आणि त्यांच्या संस्थेला देण्यासाठी आरक्षित भूखंड भाड्याने देण्याचे दुकान उघडल्याचा फलक मनपा भवनावर लावावा असे चेतन पवार यांनी सांगितले. तसेच दापोडी येथील सर्वे नंबर १६,१७ मधील क्रीडांगणाचे आरक्षण मनपाने ताबडतोब विकसित करावे, हे आरक्षण देखील खाजगी संस्थेला किंवा कारभाऱ्यांना देण्याची भीती आहे. ताथवडे येथील जिल्हा परिषद शाळा मनपा शिक्षण विभागाकडे वर्ग करून शिक्षण विभागाने तेथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, खेळाचे साहित्य, ग्रंथालय, प्रयोगशाळा उपलब्ध करून द्यावी. मनपा शिक्षण विभागाच्या वतीने मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणारे गणवेश आणि शालेय साहित्य याची फेरनिविदा काढावी. पवना, इंद्रायणी नदी प्रदूषित करणाऱ्या कारखान्यांवर, आस्थापनांवर आणि याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी. ताथवडे येथे बांधकाम राडारोडा टाकण्यासाठी आरक्षित असणाऱ्या जागेवर कचरा टाकला जातो. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते. तेथे कचरा टाकने बंद करावे. शहरातील सर्वच नाल्यांची साफसफाई करावी.

ताथवडे येथे (सर्वे नंबर ६४/२/१) "ड" प्रभाग कडून खासगी कन्सल्टंट चा अभिप्राय घेऊन नाला शिफ्ट करण्यात आला. तेथे नाला वळविण्यात आल्यामुळे परिसरातील नागरिकांची गैरसोय होत आहे. येथील नागरिकांना त्रास देऊन हे सर्व बिल्डरच्या फायद्यासाठी केले आहे. या प्रकल्पाचा बांधकाम परवाना ताबडतोब रद्द करावा अशी मागणी येथील नागरिकांची आहे. या जागर मोर्चा पारंपरिक वाद्यांचा गजर करीत पोतराजाचा वेष परिधान करून प्रशासनाच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. या मोर्चामध्ये सर्व निष्ठावंत शिवसैनिक आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मुंबई-पुणे महामार्गावरील विकासकामांची उपमहापौर शर्मिला बाबरांकडून पाहणी

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मुंबई-पुणे महामार्गावरील सुरू असलेल्या विविध विकासकामांची उपमहापौर शर्मिला बाबर यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामांचा आढावा घेतला. तसेच कामांदरम्यान उद्भवणाऱ्या अडचणींची माहिती घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

पीसीएमसी मेट्रो स्टेशन ते निगडी या मार्गावरील विविध विकासकामांच्या अनुषंगाने गुरुवार, दि. १८ जून २०२६ रोजी आयोजित पाहणी दौऱ्यात उपमहापौर शर्मिला बाबर यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांच्या प्रगतीची सविस्तर माहिती घेतली. विकासकामे दर्जेदार पद्धतीने आणि निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याबरोबरच नागरिकांना होणारा त्रास कमीत कमी ठेवण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

कामांमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडी, पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित बाबी तसेच इतर नागरी समस्यांचे तात्काळ निराकरण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित विभागाला दिले. विकासकामे करताना नागरिकांच्या सुरक्षिततेला आणि सोयीसुविधांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे, असे त्यांनी नमूद केले.

पाहणीदरम्यान उपमहापौर शर्मिला बाबर यांनी प्रत्यक्ष स्थळभेट देऊन विविध कामांच्या प्रगतीची पाहणी केली तसेच नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी आणि विकासकामे अधिक प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## मालमत्ता कर भरण्यासाठी शनिवार व रविवारीही कॅश काऊंटर राहणार सुरू


**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून नागरिकांना देण्यात आलेल्या विविध कर सवलतींचा अधिकाधिक लाभ घेता यावा यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मालमत्ता कर भरण्यासाठी शनिवार व रविवारी (२० व २१ जून तसेच २७ व २८ जून) महापालिकेच्या सर्व १८ विभागीय कर संकलन कार्यालयांमधील कॅश काऊंटर सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती कर संकलन विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत १८ जून पर्यंत ३८१ कोटी ६० लाख रुपयांचा कर भरणा झाला आहे. महापालिकेच्या वतीने दरवर्षी आर्थिक वर्षाच्या प्रारंभी मालमत्ताधारकांना विविध सवलती जाहीर केल्या जातात. यंदाही ३० जून २०२६ पर्यंत कर भरणाऱ्या नागरिकांसाठी आकर्षक सवलती उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

## वाहनांचे हस्तांतरण करताना आधार कार्डचा बेकायदेशीर वापर

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहनांचे हस्तांतरण करताना आधार कार्डचा बेकायदेशीरपणे वापर करून पत्त्यांमध्ये फेरफार केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या गंभीर गैरप्रकारामुळे आरटीओच्या सुरक्षा यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, यात गुंतलेल्या एजंट व दोषींवर कडक फौजदारी कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. नियमबदलांनुसार आरटीओ कार्यालयात वाहनांचे




हस्तांतरण, बोजा नोंदवणे किंवा बोजा कमी करणे अशा विविध कामांसाठी पॅन कार्ड आणि संबंधित परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील आधार कार्ड असणे अनिवार्य आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात जुन्या कार व दुचाकींच्या खरेदी-विक्रीची मोठी बाजारपेठ आहे.अनेकदा मूळ वाहन मालक किंवा खरेदीदार इतर जिल्ह्यातील किंवा राज्यातील असतो. वाहन विक्री केल्यानंतर त्यावर असणारा वित्त संस्थेचा बोजा कमी करण्याचा अधिकार स्थानिक आरटीओलाच असतो. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर मूळ 'आरसी बुक' जुन्या मालकाच्या पत्त्यावर जाण्याची शक्यता असते. या तांत्रिक अडचणीवर तोडगा म्हणून काही आरटीओ प्रतिनिधींनी (एजंट) थेट 'आधार'चाच आधार घेतला.

संगणकीय सॉफ्टवेअरच्या साहाय्याने आधार कार्डवरील पत्त्यांमध्ये बेकायदेशीर बदल करून अनेक वाहनांचे हस्तांतरण परस्पर उरकून घेतल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

सुरक्षेचा गंभीर प्रश्न; गुन्हेगारीला खतपाणी?हा प्रकार केवळ कागदपत्रांमधील फेरफार पुरता मर्यादित नसून सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. या बनावट पत्त्यांच्या आधारे एखादे वाहन गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीच्या नावावर हस्तांतरित झाल्यास आणि त्या वाहनाचा वापर देशविघातक किंवा गुन्हेगारी कृत्यांसाठी झाल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. मूळ मालकाला नाहक कायदेशीर कचाट्यात सापडावे लागण्याची भीती व्यक्त होत आहे.

# सोसायट्यांवरील दंडात्मक कारवाई तुर्तास रोखा : आमदार शंकर जगताप

पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांवर (Bulk Waste Generators) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये करण्यात येणाऱ्या दंडात्मक कारवाईला तात्काळ स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. नियमांची व्यवहार्यता न तपासता थेट दंडात्मक कारवाई केल्यास नागरिकांमध्ये भीतीचे व असंतोषाचे वातावरण निर्माण होऊ शकते, याकडे देखील त्यांनी लक्ष वेधले आहे.

महापालिका प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापनांतर्गत गृहनिर्माण सोसायट्या व व्यावसायिक आस्थापनांना नोटिसा पाठवण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार शंकर जगताप यांनी



आयुक्तांची भेट घेऊन त्यांना निवेदन देत जनभावना प्रशासनासमोर मांडल्या.

आमदार जगताप यावेळी म्हणाले, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने महापालिकेचे पाऊल स्वागतार्ह आहे. मात्र, या नियमांच्या अंमलबजावणीबाबत नागरिक, गृहनिर्माण संस्था (सोसायट्या) आणि व्यावसायिक आस्थापना यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर संभ्रम, अस्वस्थता आणि असंतोष निर्माण झाला आहे.

अनेक गृहनिर्माण संस्थांना 'BWG' म्हणून लागू होणाऱ्या निकषांची, आवश्यक तांत्रिक सुविधांची आणि आर्थिक तरतुदींची पुरेशी माहिती उपलब्ध झालेली नाही.


## तळेगाव दाभाडे नगर परिषद

तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे
दूरध्वनी क्र : १८००-२३३-२७३४
ई-मेल : talegaondabhademc@gmail.com
बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. २५४९/०२६ | दिनांक : १९/०६/२०२६

### जाहीर निविदा सूचना

तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समिती अंतर्गत नगरपरिषद हद्दीतील महिलांना खालील तपशिलातील प्रशिक्षण द्यावयाचे आहे. त्याकरिता नोंदणीकृत संस्था, शासकीय व निमशासकीय कामाचा अनुभव असणाऱ्या निविदाधारकांनी निविदा भरावयाची आहे. सर्व करारासहीत द्विलिफाफा पद्धतीने निविदा मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्रति दिवस प्रशिक्षण शुल्क | बयाणा रक्कम रूपये | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | नगरपरीषद हद्दीतील महिलांकरीता nail art चे प्रशिक्षण देणे. | /- | १०,०००/- | ५००/- + GST |
| २ | नगरपरीषद हद्दीतील महिलांकरीता fabrik painting चे प्रशिक्षण देणे. | /- | १०,०००/- | ५००/- + GST |

निविदा वेळापत्रक

| अ. क्र. | नगरपरिषद प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १ | कोरे निविदा अर्ज घेणे | दि. २२/०६/२०२६ ते ३०/०६/२०२६ कार्यालयीन वेळेत |
| २ | बयाना रक्कमेसह निविदा अर्ज स्विकारणे | दि. ०१/०७/२०२६ दुपारी १.०० पर्यंत |
| ३ | निविदा उघडणे | दि. ०१/०७/२०२६ सायं. ४.०० नंतर |

तसेच कोणत्याही कारणामुळे त्याच दिवशी निविदा उघडणे शक्य न झाल्यास त्याबाबतची निविदा उघडणेची पुढील तारीख व वेळ नगरपरिषद सुचना फलकावर लावण्यात येईल. याबाबत कोणतीही व कोणासही स्वतंत्र सुचना देण्यात येणार नाही. निविदाबाबत अटी, शर्ती इ. ची अधिक माहिती कार्यालयीन वेळेत व कार्यालयामध्ये पहावयास मिळेल. सादर करण्यात आलेल्या निविदापैकी एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हा नगरपरिषदेने राखुन ठेवला आहे.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
तळेगाव दाभाडे नगरपरिषद

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गुरुवर्य विद्यावत्सल यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प

चाकण (दैनिक संध्या) : अखिल भारतीय विद्यार्थी सेनेचे संस्थापक - अध्यक्ष, गुरुवर्य विद्यावत्सल यांच्या जयंतीनिमित्त चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन बैठकीत विद्यावत्सल यांच्या संस्कारक्षम विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करण्यात आला. येथील श्रीराम सोसायटीतील विद्यावत्सल अभ्यासिका, ग्रंथालयात किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके यांच्या हस्ते विद्यावत्सल यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी किल्लेदार फिरंगोजी नरसाळा पतसंस्थेचे उपाध्यक्ष सत्यवान तांबे, राहुल वाडेकर, राजू दिक्षित, शिवानंद बंडे, ॲड. अनंत देशमुख, विनायक पोकळे, स्वामी कानपिळे, रेश्मा दौंडकर, नम्रता कुलकर्णी, अरुणा सावंत, विजय ठाकूर, ॲड. किशोर झिजुंरके आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ, मोठ्या संख्येने उपस्थित होते. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके यांनी यावेळी सांगितले की," गुरुवर्य विद्यावत्सल यांच्यासारखी निर्भीड आणि धाडसी माणसे पुन्हा जन्माला आली पाहिजेत. ज्ञान प्रसार, वाचन संस्कृती संवर्धन व संस्कारक्षम समाज निर्मितीच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा आम्ही निश्चित प्रयत्न करू. जोपर्यंत विश्वाला गती आहे, तोपर्यंत गुरुवर्य विद्यावत्सल यांच्या जीवन कार्याची फुलबाग निश्चितपणे टवटवीत राहणार आहे." सेवानिवृत्त शिक्षक राजू दीक्षित म्हणाले," विद्या वत्सल यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानच्या माध्यमातून लोकोपयोगी कामे केली जाणार आहेत."



### थेऊरमधील प्रमुख रस्त्यांवर सुरक्षिततेसाठी गतिरोधकांची उभारणी- सभापती काकडे

थेऊर (दैनिक संध्या) : थेऊर गावातील नागरिकांची सुरक्षितता व अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने थेऊर गावातील मुख्य रस्त्यांवर, हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांच्या माध्यमातून 6 ठिकाणी नवीन गतिरोधक बसविण्यात आले आहेत. गेली अनेक दिवसांची गतिरोधक बसविण्याची नागरिकांची मागणी होत होती. त्याच अनुषंगाने थेऊर येथील चिंतामणी विद्या मंदिराजवळ तसेच भाविकभक्तांची मोठी वर्दळ असलेल्या चिंतामणी मंदिराकडे जाणाऱ्या 3 रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात आले आहेत. शाळा परिसर, मंदिर परिसर व गावातील गर्दीच्या ठिकाणी वाहनांचा वेग नियंत्रित राहावा आणि नागरिक, विद्यार्थी व भाविकांची सुरक्षितता सुनिश्चित व्हावी यासाठी ही उपाययोजना करण्यात आली आहे. या कामामुळे रस्ते वाहतूक अधिक सुरक्षित होण्यास मदत होणार असून वाहनचालकांनीही गतिरोधकांजवळ सावधगिरीने वाहन चालवावे, असे आवाहन युवराज काकडे यांच्याकडून करण्यात आले.

### मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

नारायणगाव (दैनिक संध्या) : जागतिक हिवताप जनजागरण महिन्याच्या निमित्ताने, आळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात 'डिसेंट फाउंडेशन'च्या वतीने मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात एकूण १२५ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणी नंतर ६६ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पुढील उपचाराकरिता नेण्यात आले. आरोग्य तपासणीसोबतच ग्रामस्थांना हिवताप निर्मूलन आणि इतर साथीच्या आजारांबाबत सविस्तर माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. हे शिबिर शंकरा आय हॉस्पिटल पनवेल, ज्येष्ठ नागरिक संघ आळे आणि डिसेंट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सहाय्यक रोहिदास मुंजाळ, आशा गटप्रवर्तक सोनल आल्हाट,आरोग्य सेवक दत्तात्रेय डोंगरे, आरोग्य सहायिका चंद्रभागा कुदळे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी सुनंदा साबळे तसेच आरोग्य विभागातील कर्मचारी उपस्थित होते .यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. वैभव पठारे आणि डॉ. अश्विनी डोंगरे यांनी नागरिकांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमात जेष्ठ नागरिक संघाचे भागाजी शेळके व जितेंद्र बिडवाई यांची विशेष उपस्थिती लाभली.

### आळेफाटा येथे शिवसेना वर्धापण दिन साजरा

आळेफाटा (दैनिक संध्या) : शिवसेना वर्धापन दिन व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब यांचा वाढदिवसाच्या निमित्ताने आपले सहकारी तालुका समन्वयक श्री सौरभ भाऊ डोके यांनी वृद्धासाठी मोफत जेवण देणाऱ्या अन्नपूर्णा प्रतिष्ठान ला 10000/- किमतीचे किराणा साहित्य आपल्या शिवसेना परिवाराच्यावतीने दिले. त्याप्रसंगी आपले शिवसैनिक आळेफाटा शहर प्रमुख संतोषजी कुऱ्हाडे, युवासेना शहर प्रमुख अनिकेत घोडेकर, आळेफाटा उपशहरप्रमुख अनिल गडगे, आळे गावचे शाखाप्रमुख माऊली शेजवळ, आदेशजी घाटपांडे, विनोदभाऊ गडगे,सौरभभाऊ डोके, आनंदभाऊ रासकर व महिला आघाडीच्या उपतालुका संघटिका मंगलताई कुऱ्हाडे, डॉ. बाळासाहेब जाधव, दिलीप आप्पा वाव्हळ, गोपाळदादा शिंदे उपस्थित होते.




# नारायणगाव बसस्थानक येथे दागिने चोरटा जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखा व नारायणगाव पोलीस स्टेशन यांची कारवाई १८ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने जप्त

**नारायणगाव (दै. संध्या)**

नारायणगाव पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ९२/२०२६, ९३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (३) नुसार (दि.२८ एप्रिल) रोजी दाखल गुन्ह्यातील फिर्यादी नामे मीरा गणपत शिंदे, वय ४८ राहणार बोरी, साळवाडी, ता.जुन्नर जि.पुणे यांनी फिर्याद दिली की दिनांक २८/४/२०२६ रोजी दुपारी फिर्यादी ह्या नारायणगाव बस स्टॅन्ड येथून साळवाडी येथे त्यांच्या घरी जात असताना एसटी बस मध्ये चढताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या पर्समधील २० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेले होते तसेच भागवत निवृत्ती घाडगे वय ७५ यांची १.५ तोळे सोन्याची चैन देखील अज्ञात इसमाने चोरून नेली होती.

सदर फिर्यादीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे स.पो.नि. महादेव शेलार, स.पो.फौज. दिपक साबळे, पो.हवा. संदिप वारे, अक्षय नवले, अभिमन्यु मोटे या पथकाने बस स्टॅन्ड व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता सदर ठिकाणी संशयती इसम आढळून आला त्याची गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती घेतली असता सदरचा संशयित हा रेकॉर्डवरील बस स्टँड वर चोरी करणारा आरोपी असून त्याचे नाव अर्जुन कानिफनाथ भोसले वय २७ राहणार धनगर वस्ती, अहिल्यादेवी नगर, ता.श्रीरामपूर जि. अहिल्यानगर हा असून त्याच्यावर यापूर्वी विविध प्रकारचे ४० पेक्षा जास्त गुन्हे दाखल असून तो अत्यंत सराईत असल्याचे समजले.




दिनांक ६/६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला सदर इसम हा नाशिक फाटा भोसरी येथे येणार असल्याचे गोपनीय बातमीदारा मार्फत समजल्याने सदर ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथक तसेच नारायणगाव पोलिस स्टेशन पथक यांनी सापळा लावून त्यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे सदर गुन्ह्याची चौकशी केली असता त्याने सदर गुन्हे केल्याची कबुली दिली असून त्याच्या ताब्यातून गुन्ह्यात चोरीस गेलेले एकूण १८ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. पुढील तपास नारायणगाव पोलीस स्टेशन येथे सुरू आहे.

सदरची कारवाई पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदिप गिल्ल, अप्पर पोलीस श्री. शर्मा, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण सपांगे, पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर शेटे, पोलीस उपनिरीक्षक जगदेव पाटील, सहाय्यक फौजदार दिपक साबळे, पोलीस हवालदार राजू मोमिन, संदीप वारे, पोलीस शिपाई अक्षय नवले, अभिमन्यू मोटे, महिला पोलीस हवालदार नंदा कदम, सुजाता कदम, पोलीस हवालदार संतोष भापकर, भारत मोहोळ, पोहवा मंगेश लोखंडे, सत्यम केळकर, सोमनाथ डोके, महिला पोलीस हवालदार सुवर्णा गडगे, महिला पोलीस शिपाई कविता गेंगजे, पोलीस शिपाई टीलेश जाधव यांनी केली आहे.

## जेजुरी सोमवती यात्रेत अनेक भाविकांच्या 42 तोळे सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाची सोमवती यात्रा नुकतीच संपन्न झाली. या यात्रेत प्रचंड गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी 42 तोळे वजनाचे सोन्याचे दागिने लंपास केले.

याबाबत जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की दिनांक 15 रोजी जेजुरीत खंडोबा देवाची सोमवती यात्रा झाली. या यात्रेसाठी तीन लाखाहून अधिक भाविकांनी देवदर्शनासाठी गर्दी केली होती. दिनांक 14 व 15 रोजी गर्दीचा फायदा घेऊन खंडोबा मंदिर,पायरी मार्ग, गौतमेश्वर मंदिर, उभी पेठ, कोथले चौक, कऱ्हा नदी पात्र, तसेच नाझरे जलाशय आदी ठिकाणी चोरट्यांनी भाविकांच्या गळ्यातील 42 तोळे सोन्याचे दागिने चोरल्याची घटना घडली आहे. जेजुरीत प्रत्येक यात्रेत अशा घटना घडत असल्याने भाविकांच्यात मोठी नाराजी आहे.

जेजुरी येथील मंगेश भोसले यांची दीड टोळ्यांची सोन्याची चैन, तळेगाव दाभाडे येथील तुषार जाधव यांची 14 ग्राम वजनाची चेन, अमळनेर येथील रोहिणी पाटील यांचे मंगळसूत्र, आकुर्डे येथील सुनीता जगताप यांचे मंगळसूत्र, काळेवाडी येथील पूजा नागरगोजे, 4 ग्राम वजनाचे दागिने, कालेपडळ येथील सुचिता पाटील 8 ग्राम वजनाचे गंठण, मुंबई येथील चैतन्य मेहेर 8 ग्रामची चेन, आळंदी येथील ओंकार तनपुरे यांची एक तोळे ची चेन, कोरेगाव भीमा येथील धीरज परदेशी यांची दीड तोळ्यांची चेन, खराडी येथील ओम जाधव यांची दीड तोळे ची चेन, घणसोली येथील प्रकाश म्हात्रे तीन तोळ्यांची चेन, हवेली येथील अमोल घुले यांची 16 ग्रामची चेन, मुंबई येथील चंद्रकांत खैरे यांची एक तोळ्यांची चेन, कात्रज येथील रणजीत लव्हाळे यांची दोन तोळ्यांची चेन, आंबेगाव येथील रवींद्र कोकाटे यांची साडे चार तोळेची चेन, भिवंडी येथील रुपेश भोईर यांची पाच तोळे वजनाची चेन, पनवेल येथील आकाश पाटील यांचे सात तोळे ची चेन, वाई येथील स्नेहल बिंदे यांचे एक तोळे चे गंठण, पवई येथील प्रशांत आवारे यांची दोन तोळे वजनाची चेन, गोरेगाव येथील उत्तम माने यांची दीड तोळे ची चेन,आकुर्डी येथील शामल निर्मले यांचे तीन तोळे वजनाचे मंगळसूत्र, आदी भाविकांचे सुमारे 44 तोळे 8 ग्राम वजनाचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले. या सर्वांनी जेजुरी पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली आहे. दीड वर्षापूर्वी झालेल्या सोमवती यात्रेत 82 तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचे समजते.

दीड वर्षानंतर जेजुरी येथे सोमवती यात्रा भरणार असल्याने भाविकांची मोठी गर्दी होणार असल्याने असे चोरीचे प्रकार होणार असल्याचे गृहीत धरून नव्याने रुजू झालेले पोलिस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी मोठा पोलिस बंदोबस्त ठेवला होता. चौकात चोरट्यांचे फोटो असलेला फलक लावण्यात आला होता, तसेच स्पीकर वर सातत्याने चोरट्यांपासून सावध राहण्याचे आवाहन केले होते. तसेच सराई गुन्हेगारांना यात्रा अगोदर ताब्यात घेण्यात आले होते. अशी माहिती पोलिस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी दिली.



## चाकणला गांजाची तस्करी करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश; दोघांना अटक

**चाकण (दै. संध्या)**

पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेतील अंमली पदार्थ विरोधी पथकाने चाकण परिसरात गांजाची तस्करी करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश केला. या पथकाने दोघांना अटक केली असून, त्यांच्या कडून एकूण ८३ किलो ९६० ग्रॅम वजनाचा गांजा, तीन मोबाईल, रोख रक्कम व एक स्कॉर्पिओ असा एकूण ५७ लाख, ७३ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

चाकण येथे गुरुवारी (दि.१८) पहाटे चार वाजण्याच्या दरम्यान येथील रुबी बेकरी जवळ, खंडोबा माळ भागात पोलीस पथकाने सापळा लावला होता. अनिकेत राजेंद्र बिरंगळ (वय २४, रा. खंडोबा माळ, चाकण) व कुशल उद्धव पाठक (वय २४, रा. शिवसाई नगर, सुतारदरा, कोथरूड, पुणे) या दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून पोलिसांनी ४१ लाख, ९८ हजार रुपयांचा ८३ किलो ९६० ग्रॅम वजनाचा गांजा, ७५ हजार रुपयांचे तीन मोबाईल, ५१० रुपये रोख रक्कम व १५ लाख रुपयांची स्कॉर्पिओ असा एकूण ५७ लाख, ७३ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

चाकण उत्तर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा कलम ८(क), २०(ब)(ii)(क) आणि २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक रोहित दिवटे, जिलानी मोमीन तसेच अंमली पदार्थ विरोधी पथकातील अधिकारी व कर्मचारी आदींनी ही कारवाई संयुक्तपणे पार पाडली. तांत्रिक विश्लेषण करण्यासाठी पोलीस शिपाई सुभाष गुरव व प्रकाश ननावरे यांची विशेष मदत लाभली. चाकण उत्तर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राम दगडे हे याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

## बारामतीत दिवसाआड पाणीपुरवठा सुरू; निरा डावा कालवा बंद झाल्याने नियोजन बदल

**बारामती (दै. संध्या)**

पावसाने ओढ दिल्याने निरा डावा कालव्याचे आवर्तन बंद झाले असून, उपलब्ध पाणीसाठा मर्यादित असल्याने बारामती शहरात दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय बारामती नगरपरिषदेने घेतला आहे. गुरुवार (दि. १८) पर्यंत नियमित पाणीपुरवठा करण्यात येणार असून, त्यानंतर दिवसाआड पाणीपुरवठा केला जाणार आहे.

नगरपरिषदेच्या माहितीनुसार, शहरातील पाटस रिंगरोड आणि सायली हिल-जळोची जलशुद्धीकरण केंद्रांवरून होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार काही भागांत शुक्रवारी, तर काही भागांत शनिवारी पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

> नागरिकांनी आवश्यक पाणीसाठा करून पाण्याचा जपून व काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे. निरा डावा कालव्यातील पाण्याचा प्रवाह पूर्ववत सुरू होईपर्यंत दिवसाआड पाणीपुरवठा व्यवस्था कायम राहणार आहे.
> - पंकज भुसे, मुख्याधिकारी

## पुणे जिल्हा नाभिक महामंडळाच्या अध्यक्षपदी निलेश पांडेंची निवड

**जेजुरी (दै. संध्या)**

पुणे जिल्हा, पुणे शहर आणि पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने महाराष्ट्र नाभिक महामंडळातील पदाधिकाऱ्यांचा कार्यविस्तार व स्नेह मेळावा भोसरी येथे पार पडला. यावेळी पुणे जिल्हा नाभिक महामंडळाच्या अध्यक्षपदी नांदेड सिटी येथील ज्येष्ठ कार्यकर्ते निलेश पांडे यांची दुसऱ्यांदा निवड करण्यात आली.

या कार्यविस्तार मेळाव्यात पुणे जिल्हाध्यक्ष म्हणून निलेश पांडे, जिल्हा कार्याध्यक्ष गणेश वाळुंजकर, पुणे शहराध्यक्ष महेश सांगळे ,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सागर आढाव, पश्चिम महाराष्ट्र विभागीय संघटकपदी सचिन सूर्यवंशी, पिंपरी चिंचवड महिला शहर अध्यक्ष.स्नेहल राऊत यांच्या निवडी करण्यात आल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र नाभिक महामंडळ ही नाभिक समाजाची मातृसंस्था असून कै.हनुमंतराव साळुंखे तात्या, ना भु संगमवार, वामनराव देसाई यांनी ग्रामीण भागातील पारंपारिक नाभिक समाजाला गावगाड्यातील जोकडातून बाहेर काढण्यासाठी या संघटनेची स्थापना 1981 स्थापना केली आहे. महाराष्ट्रात समाज जरी विस्थापित असला तरी एकत्रित समाजाच्या वतीने शासनावरती दबाव निर्माण करण्याची गरज आहे. प्रतापगडाच्या पायथ्याशी



छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे जिवाजी महाले यांचे आणि पन्हाळगडाच्या पायथ्याशी शिवाजी काशीद यांचे स्मारक सुशोभीकरण करण्याची गरज आहे. कारण ते सर्व इतिहास प्रेमींचे प्रेरणास्थान आहे. तुम्ही संघटनेवर आईच्या मायेने प्रेम करा संघटना निश्चितपणे तुम्हाला न्याय देईल, आपल्या व्यवसायामध्ये बदल करा अत्याधुनिक व्यवसाय ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार यांनी केले. यावेळी माजी प्रदेशाध्यक्ष दत्ताजी अनारसे, घनश्याम वाघ, विकास मदने, पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष बाबासाहेब काशीद, संतोष फडतारे, मयूर रोकडे, सुमनताई पवार बाळासाहेब तावरे, सारीका शिंदे अनिता वाळुंजकर निर्मला आढाव, भगवान शिंदे, राजेश पाथरकर मारुती पंडित राजेंद्र दळवी,अप्पा इभाड, देवेंद्र लोखंडे,व प्रत्येक जिल्हा व तालुक्यातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## वनविभागाच्या आवाहनाला डिसेंट फाउंडेशनचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जुन्नर (दै. संध्या)**

पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत डिसेंट फाउंडेशन, पुणे या सामाजिक संस्थेने वनविभाग जुन्नर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत बहारडोली जातीच्या जांभूळ बियांचे २५ किलो संकलन करून वनविभागाकडे सुपूर्द केले. या उल्लेखनीय कार्याबद्दल वनविभागाने डिसेंट फाउंडेशनचे विशेष कौतुक केले आहे.

डिसेंट फाउंडेशन ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन व पर्यावरण संरक्षणाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहे. संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली जाते तसेच लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्यावरही विशेष भर दिला जातो. केंद्र शासनाच्या "एक पेड माँ के नाम" या उपक्रमातही संस्थेचा मोलाचा सहभाग राहिला आहे.



सध्या वाढते तापमान, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलन यामुळे पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर वनविभाग आणि सामाजिक संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

याविषयी माहिती देताना वनरक्षक देविदास मिसाळ यांनी सांगितले की, वनविभागामार्फत यावर्षी जुन्नर येथील रोपवाटिकेमध्ये पन्नास हजारांपर्यंत विविध जातींची रोपे तयार करण्यात आली आहेत. आगामी पावसाळ्यात ही रोपे विविध ठिकाणी लावण्यात येणार असून पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनीही वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## विज्ञान केंद्र कार्यशाळेस बेनके यांची भेट

**नारायणगाव (दै. संध्या)**

नारायणगाव कृषी केंद्र येथे सेंद्रिय शेतीमधील व्यावसायिक संधी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत सेंद्रिय शेती,आधुनिक बाजारपेठ,मूल्यवर्धन आणि शेतमालाच्या प्रभावी विपणनाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.


यावेळी श्री.मनोहर शेटे यांनी सेंद्रीय शेतीतील नव्या संधी आणि शेतकऱ्यांनी स्वीकारावयाच्या आधुनिक पद्धती याविषयी मार्गदर्शन केले.तसेच kisan connect चे प्रतिनिधी,IDVA चे अध्यक्ष श्री.सारंग निर्मळ, स्मार्ट प्रकल्प अधिकारी, सेंद्रिय शेती करणारे प्रगतशील शेतकरी आणि सप्लाय चेन अधिकारी यांनीही आपले अनुभव व विचार मांडले.




कार्यक्रमास मा.आमदार श्री.अतुल बेनके, सौ. गौरी बेनके यांची प्रमुख उपस्थिती लाभली.यानंतर उपस्थित मान्यवरांनी kisan connect भाजीपाला सप्लाय चेन प्रकल्पाला भेट देऊन शेतकऱ्यांकडून ग्राहकांपर्यंत दर्जेदार उत्पादन पोहचविण्याची आधुनिक व्यवस्था जाणून घेतली. सेंद्रिय शेतीला बाजारपेठेशी जोडून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरली.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### उपनगरात आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून रोजी

मुंबई (दैनिक संध्या) : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून रोजी मुंबई उपनगर जिल्ह्यात विविध ठिकाणी योग कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, मुख्य कार्यक्रम सौमय्या महाविद्यालय येथे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी सायली जाधव यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्यासाठी योगाचे महत्त्व लक्षात घेऊन दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. यावर्षी मुख्य कार्यक्रमासोबतच बोरिवली येथील शैलेंद्र स्कूल आणि विलेपार्ले येथील एन. एम. कॉलेज येथेही योग दिनानिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी नेहरू युवा केंद्र आणि दीक्षा कदम संस्था यांचे सहकार्य लाभले आहे. या कार्यक्रमांना लोकप्रतिनिधी, जिल्हाप्रशासनातील अधिकारी, नामांकित खेळाडू तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार आहेत. योगाबाबत जनजागृती व्हावी आणि त्याचा अधिकाधिक प्रसार व्हावा, यासाठी जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये चर्चासत्रे, परिसंवाद आणि कार्यशाळांचे आयोजनही करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन योग दिन उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

### अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांवर कारवाई

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व्हावा यासाठी परिवहन विभागाने धोरणात्मक व ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. 1 जून ते 15 ऑगस्ट 2026 या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले असून, 15 ऑगस्टनंतर प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची अधिकृत तज्ज्ञ संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या संस्थांमार्फतच चालकांना मोफत मराठी भाषा प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांच्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्रच परिवहन विभागाकडून ग्राह्य धरले जाणार आहे.

### खाणी राज्य खनिज महामंडळाला द्याव्यात

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्राला देशातील 'ग्रीन स्टील हब' बनविण्याच्या उद्देशाने केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्रालयाने गडचिरोलीतील सहा लोहखनिज खाणी महाराष्ट्र राज्य खनिज महामंडळाला द्याव्यात, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्री जी. किशन रेड्डी यांच्याकडे केली. या खाणी राज्य शासनाला मिळाल्यास दोन वर्षात कार्यान्वित करून 2030 पर्यंत उत्पादन सुरू करून पुढील काळात स्टील उत्पादन निर्यातदार म्हणून भारताला पुढे आणू असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. राज्यातील खनिकर्म व ऊर्जा निर्मिती संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा या शासकीय निवासस्थानी केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्री जी. किशन रेड्डी यांच्या समवेत बैठक झाली. यावेळी केंद्रीय खनिकर्म राज्यमंत्री सतीशचंद्र दुबे, राज्याचे खनिकर्म राज्यमंत्री पंकज भोयर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, केंद्रीय अतिरिक्त सचिव वीणा कुमारी, कोळसा मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिव भूपिंदर ब्रार, राज्याच्या पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, जलसंपदा विभागाचे सचिव एकनाथ डवले, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिपेंद्रसिंह कुशवाह, जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाळ, उपाध्यक्ष रविश कुमार सिंह यांच्यासह कोल इंडिया, वेस्टर्न कोलफिल्डचे अधिकारी उपस्थित होते. गडचिरोलीमधील लोहखनिज देशातील सर्वाधिक दर्जेदार खनिजांपैकी एक आहे. त्यामुळे गडचिरोली हे भविष्यात देशातील महत्त्वाचे औद्योगिक व पोलाद उत्पादन केंद्र म्हणून विकसित होईल.

# विकासासाठी विविध प्रकल्पांना गती – मंत्री आदिती तटकरे

## कणघर येथे बायोडायव्हर्सिटी झोन उभारणार

■ मुंबई (दै. संध्या)

श्रीवर्धन मतदारसंघाचा पर्यटनदृष्ट्या सर्वांगीण विकास करण्यासाठी कणघर ता. म्हसळा येथे बायोडायव्हर्सिटी झोन विकसित करण्यात यावा. त्यासाठी सुमारे २० एकर जागा निश्चित करण्याच्या सूचना मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या.

म्हसळा-श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन विकासाच्या दृष्टीने सुरू असलेल्या विविध प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीस रायगड जिल्हाधिकारी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) किसन जावळे, महाडचे कार्यकारी अभियंता कांबळे, जिल्हा वनसंरक्षक जाधव, उपअभियंता सोनिया महिल, रोहा विभागाचे वन अधिकारी स्वप्नील चोरमारे, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सूर्यवंशी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे संतोष रोकडे, संतोष जाधव तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, श्रीवर्धनचा पर्यटनदृष्ट्या विकास झाल्यास पर्यटकांची संख्या वाढण्यास मदत होईल आणि स्थानिकांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील. कणघर परिसरातील जैवविविधतेचे संवर्धन आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी येथे बायोडायव्हर्सिटी झोन विकसित करण्यात यावा. या परिसरात निलगिरी वूड पिजन, मलबार पॅराकीट, मलबार ग्रे हॉर्नबिल, व्हाईट-चीक्ड बार्बेट आणि पर्पल-रम्प्ड सनबर्ड यांसारख्या विविध पक्षी प्रजाती आढळतात. या पक्ष्यांविषयीची माहिती पर्यटक आणि पक्षीप्रेमींपर्यंत पोहोचावी यासाठी पक्षी निरीक्षण केंद्र उभारण्यात यावे. तसेच परिसरात वॉक-वे आणि पाथ-वे विकसित करण्यासाठी प्राथमिक प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीत दिवेआगार येथील ॲक्वारियम आणि समुद्रकिनारा सौंदर्यीकरणासंदर्भातील सादरीकरणही करण्यात आले. यासंदर्भातील प्रस्ताव महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे तातडीने सादर करून पुढील कार्यवाहीला गती द्यावी, असे निर्देश मंत्री तटकरे यांनी दिले. समुद्रकिनाऱ्याचे सौंदर्यीकरण मरीन थीम लक्षात घेऊन करण्यात यावे, सौरऊर्जेवर आधारित सुविधांचा वापर करावा तसेच वॉटर स्पोर्ट्स सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले.




याशिवाय, हरिहरेश्वर येथील प्रदक्षिणा मार्गाच्या कामालाही गती देण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. दि चिल्ड्रेन्स एड सोसायटीच्या मालकीच्या मानखुर्द व बोर्ला येथील जमिनीची हद्द निश्चित करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज येथे दिले.

चिल्ड्रन्स एड सोसायटीच्या अधिनस्त असलेल्या मानखुर्द व बोर्ला येथील जागेच्या अतिक्रमण संदर्भात आढावा घेण्यासाठी मंत्रालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, मानखुर्द येथील संस्थेच्या जमिनीवर मोठ्याप्रमाणात अतिक्रमण असून, काही जमिनी विविध संस्थांना भूसंपादनाद्वारे हस्तांतरित करण्यात आल्या असल्या तरी संबंधित नकाशे व अभिलेख उपलब्ध नसल्याने अचूक हद्द निश्चित करण्यात अडचणी येत आहेत. परिणामी अनधिकृत बांधकामे व बेकायदेशीर व्यवसाय वाढून बालगृहातील बालकांच्या सुरक्षिततेवर परिणाम होत आहे. बोर्ला येथील संस्थेच्या जागेवरही मोठ्याप्रमाणात अनधिकृत झोपड्या उभारण्यात आल्याने मालमत्तेच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. 2016-17 मध्ये अतिक्रमण हटविण्यात आले होते; मात्र कोविडनंतर पुन्हा मोठ्याप्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत. नुकत्याच झालेल्या पाहणीत नव्याने 50 ते 60 अनधिकृत बांधकामे उभारण्यात आल्याचे आढळून आले. यामुळे बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर मानखुर्द व बोर्ला येथील संस्थेच्या जमिनींची भूमापन विभागामार्फत तातडीने मोजणी करून अचूक हद्द निश्चित करण्याचे निर्देश मंत्री तटकरे यांनी दिले.

## योग दिनानिमित्त 'दिलखुलास' कार्यक्रमात प्रा. डॉ. वृषाली उजेडे यांची विशेष मुलाखत

■ मुंबई (दै. संध्या)

योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनासाठी योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. संयुक्त राष्ट्र संघाने २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून घोषित केल्यानंतर जगभरात या दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. या पार्श्वभूमीवर रा. आ. पोदार आयुर्वेद वैद्यक महाविद्यालय, वरळी येथील स्वस्थवृत्त व योग विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. वृषाली उजेडे यांची विशेष मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमातून प्रसारित होणार आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमातून ही मुलाखत २२ ते २६ जून २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून आणि 'News On AIR' या मोबाईल ॲपवर प्रसारित होणार आहे. या मुलाखतीचे निवेदन निवेदिका सुचेता गरुडे यांनी केले आहे. यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना निरोगी वृद्धत्वाकरिता योग



अशी असून शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्य संवर्धनासाठी योगाचे योगदान अधोरेखित करण्यात येत आहे. नियमित योगाभ्यासामुळे तणाव नियंत्रण, रोगप्रतिकारक शक्ती वाढ, मानसिक स्थैर्य, एकाग्रता आणि जीवनशैलीजन्य आजारांपासून संरक्षण मिळण्यास मदत होते. आधुनिक धकाधकीच्या जीवनात योगाचे वाढते महत्त्व, विविध योगप्रकार, दैनंदिन जीवनातील योगाचा उपयोग, योग व मानसिक आरोग्य यांचा संबंध; तसेच सर्व वयोगटांसाठी योगाचे फायदे याविषयी डॉ. उजेडे यांनी या मुलाखतीत सविस्तर माहिती दिली आहे.

## योग साधनेतून अन्वीने दिव्यांगाच्या मर्यादेवर केली मात

### 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' विजेती अन्वीचा मुख्य सचिवांच्या हस्ते गौरव

■ मुंबई (दै. संध्या)

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित 'रबर गर्ल ऑफ इंडिया' म्हणून ओळखली जाणारी दिव्यांग योगसाधिका अन्वी विजय झांझरूकिया हिने योग साधनेच्या माध्यमातून दिव्यांगत्व ही मर्यादा नसून जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर मोठे यश संपादन करता येते, हे आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

१२ व्या योग दिनानिमित्त सामान्य प्रशासन विभागातर्फे आज मंत्रालयात योग प्रात्यक्षिकांचे आयोजन केले होते. यावेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांच्यासह मंत्रालयातील विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अन्वी झांझरूकिया हिने आकर्षक योग प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तिने देशभरातील ५० हून अधिक योग स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवत 50 पेक्षा अधिक पदके पटकावली आहेत. तसेच २०० हून अधिक योगासने करण्याचे कौशल्य तिने आत्मसात केले आहे. दिव्यांगत्वावर यशस्वीपणे मात करत योगाच्या माध्यमातून आरोग्य आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश लाखो लोकांपर्यंत पोहोचविण्याचे उल्लेखनीय कार्य ती करत आहे.

नुकत्याच चंदिगढ येथे झालेल्या अखिल भारतीय नागरी सेवा योगासन स्पर्धा २०२५-२६ मधील महाराष्ट्राच्या विजेत्यांचाही गौरव करण्यात आला. ४० ते ५० वर्षे वयोगटात शुभांगी चिकटे यांनी प्रथम क्रमांक, ४० पेक्षाकमी वयोगटात श्रीकांत घोलकर यांनी द्वितीय क्रमांक, तसेच ५० वर्षांवरील गटात दत्तात्राम सावंत आणि जगन्नाथ लांडगे यांना संयुक्तिकरित्या द्वितीय क्रमांक पटकावत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. या सर्व विजेत्यांनी मंत्रालयात योगाची प्रात्यक्षिके सादर केली. अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. सचिवालय जिमखान्याच्या योग शाखेच्या सचिव अपर्णा जाधव यावेळी उपस्थित होत्या. कार्यक्रमात योगा इन्स्टिट्यूटच्यावतीने समीर व्यास यांनी मंत्रालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना खूर्ची योगाचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. योगाचे नियमित आचरण करून निरोगी आणि संतुलित जीवनशैली अंगीकारण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

## कारागृह पुनर्विकास आणि आधुनिकीकरण प्रकल्पांना गती द्या

### राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर : कारागृह विकास प्रकल्पांमुळे बंदी क्षमता व सुविधा वाढणार

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील कारागृहांच्या पुनर्विकास, स्थलांतर आणि आधुनिकीकरणासाठी हाती घेण्यात आलेल्या महत्वाच्या प्रकल्पांची कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यासाठी गतीने कार्यवाही करण्याच्या सूचना गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १८ मे २०२६ रोजी आयोजित कारागृहाबाबत आढावा बैठकीत दिलेल्या निर्देशांच्या अनुपालनाबाबत मंत्रालयात राज्यमंत्री डॉ. भोयर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी नागपूर, वर्धा आणि मुंबई मध्यवर्ती कारागृहांच्या स्थलांतर व पुनर्विकास प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीस एमएसआयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, कारागृहे व सुधारसेवाचे महासंचालक सुहास वारके, गृह विभाग (तुरुंग)चे सहसचिव सुग्रीव धपाटे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांनी विविध प्रकल्पांच्या कामकाजाच्या सद्यस्थितीचे




सादरीकरण केले.

राज्यातील कारागृह व्यवस्थेचे आधुनिकीकरण, बंदी क्षमता वाढविणे तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे प्रकल्प अत्यंत महत्वाचे असल्याचे राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी नमूद केले. मानखुर्द येथे आधुनिक बहुमजली कारागृहाचे बांधकाम आणि अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थाने, मंडाले येथे कारागृह मुख्यालयाची प्रशासकीय इमारत, मड बेट (दारवली, ता. बोरिवली) येथे उच्च सुरक्षा कारागृह, प्रशिक्षण केंद्र आणि शासकीय निवासस्थाने, मुंबई मध्यवर्ती कारागृहाचा पुनर्विकास करून कारागृह व शासकीय निवासस्थाने उभारणे, नागपूर मध्यवर्ती कारागृह स्थलांतरित करून नियोजित जागेवर नवीन मध्यवर्ती, जिल्हा व खुले कारागृह; तसेच शासकीय निवासस्थाने, वर्धा जिल्हा कारागृह स्थलांतरित करून नियोजित जागेवर नवीन वर्धा मध्यवर्ती कारागृह व शासकीय निवासस्थाने बांधणे इत्यादी.

## म्हाडा नागपूर मंडळातील प्रकल्प तातडीने मार्गी लावा – राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

■ मुंबई (दै. संध्या)

म्हाडा नागपूर मंडळांतर्गत सुरू असलेले विविध विकास प्रकल्प आणि प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत नागपूर मंडळातील विविध प्रकल्पांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस म्हाडा प्राधिकरणाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखडे तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी नागपूर मंडळातील रिक्त पदांच्या स्थितीचा आढावा घेण्यात आला; तसेच चंद्रपूर येथील सार्वजनिक उद्यान प्रकल्पासाठी ईओआय प्रक्रिया, हायर परचेस योजनेअंतर्गत व्याजाच्या रकमेसाठी राबविण्यात येणारी अभय योजना, नवीन चंद्रपूर येथील सिमेंट काँक्रीट रस्ते विकास कामे, चंद्रपूर; तसेच वर्धा येथील वृद्धाश्रम प्रकल्प आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी संबंधित प्रकल्पांच्या



सद्यस्थितीचा आढावा घेत आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तत्काळ पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रकल्पांची कामे निर्धारित कालावधीत पूर्ण व्हावीत, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे त्यांनी सांगितले. तसेच प्रलंबित विषयांचा त्वरित निपटारा करून विकासकामांना गती देण्याबरोबरच प्रकल्पांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्देशही डॉ. भोयर यांनी संबंधित विभागप्रमुखांना दिले.

## कोळसा वायूकरणामुळे भारत ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होईल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




■ मुंबई (दै. संध्या)

कोळसा वायूकरण (कोल गॅसिफिकेशन) विकसित भारताच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. ऊर्जा क्षेत्रातील आत्मनिर्भरतेसाठी हा परिवर्तनाचा निर्णायक टप्पा आहे. केंद्र शासनाच्या धोरणांना पूरक अशी राज्याची धोरणे राबवून विदर्भाला कोळसा वायूकरण आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या उत्पादनांचे प्रमुख केंद्र बनविण्याचा राज्य शासनाचा निर्धार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हॉटेल ताज लँडस एन्ड, बांद्रा येथे केंद्रीय कोळसा मंत्रालयाने आयोजित केलेल्या 'सरफेस कोल / लिग्नाइट गॅसिफिकेशन प्रमोशन रोड शो' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्री जी. किशन रेड्डी, केंद्रीय खनिकर्म राज्यमंत्री सतीशचंद्र दुबे, केंद्रीय कोळसा मंत्रालयाचे सचिव विक्रम देव दत्त, अतिरिक्त सचिव भूपिंदर ब्रार, सरोज कुमार झा तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, गुंतवणूकदार उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोळसा वायूकरणाचा इतिहास मुंबईशी जोडलेला आहे. १८६२ मध्ये बॉम्बे गॅस कंपनीने परळ येथे कोळसा वायूकरण प्रकल्प सुरू केला होता. त्यामुळे या क्षेत्रातील देशाचा ऐतिहासिक वारसा मुंबईकडे असून, आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भारत पुन्हा या क्षेत्रात मोठी झेप घेईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत' या संकल्पना साकार करण्यासाठी ऊर्जा क्षेत्रातील स्वावलंबन अत्यावश्यक आहे. आजही देशाला तेल, वायू आणि इतर ऊर्जा स्रोतांच्या आयातीवर दरवर्षी मोठा निधी खर्च करावा लागतो. त्यामुळे परकीय चलनावर ताण येतो, महागाई वाढते आणि जागतिक घडामोडींचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी स्वच्छ व स्वदेशी ऊर्जा निर्मितीला चालना देणे गरजेचे आहे.

भारताने २०३० पर्यंत ५०० गिगावॅट स्वच्छ ऊर्जा निर्मितीचे लक्ष्य ठेवले असून, देशाने आधीच २८३ गिगावॅट क्षमतेचा टप्पा पार केला आहे. सौर, पवन आणि हरित हायड्रोजनबरोबरच कोळसा वायूकरणही ऊर्जा सुरक्षेचा महत्त्वाचा आधार ठरणार आहे. भारताकडे सुमारे ४०० अब्ज टन कोळशाचा साठा आहे. या कोळशापासून इथेनॉल, मिथेनॉल, युरिया, विविध रसायने आणि कार्बन कॅप्चर, युटिलायझेशन अँड स्टोरेज तंत्रज्ञानाद्वारे पर्यावरणपूरक औद्योगिक विकासाला चालना देता येईल. त्यामुळे प्रदूषणात घट होऊन उद्योग क्षेत्र अधिक शाश्वत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. कोळसा वायूकरण उद्योगाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने हजारो कोटी रुपयांचे प्रोत्साहन जाहीर केले आहे. महाराष्ट्र शासनानेही त्याला पूरक धोरण जाहीर केले असून, भांडवली अनुदानासह विविध सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सोमतवाडी येथे विद्यार्थिनींचे उत्साहात स्वागत

नारायणगाव (दैनिक संध्या) : शासकिय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा, सोमतवाडी येथे नवीन शैक्षणिक वर्षाचे स्वागत अत्यंत उत्साहात करण्यात आले. यावेळी नवीन प्रवेशित विद्यार्थिनींचे स्वागत आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला. प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन या कार्यक्रमाचे अध्यक्षपद मुख्याध्यापिका कल्पना गर्जे यांनी भूषवले. प्रमुख पाहुण्या म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी अमृता शेवंते उपस्थित होत्या. शाळेत पहिल्यांदाच पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थिनींचे गुलाबपुष्प देऊन प्रेमळ स्वागत करण्यात आले.विद्यार्थिनींना केवळ प्रवेशच दिला नाही, तर त्यांच्या पुढील अभ्यासासाठी नवीन पाठ्यपुस्तके आणि शैक्षणिक साहित्याचे वाटपही करण्यात आले. गेल्या शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनींचा विशेष सत्कार करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. शिक्षक राजेश म्हस्के यांनी प्रास्ताविकात शाळेचे ध्येय आणि ‘माझी शाळा - माझा स्वाभिमान’ या उपक्रमाची माहिती दिली. तसेच, अमृता शेवंते यांनी आधुनिक शिक्षण पद्धती आणि 'निपुण महाराष्ट्र अभियाना'चे महत्त्व विषद केले.याप्रसंगी सरपंच पूनम भालेकर यांनी विद्यार्थिनींच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### मोफत एसटी पासने विद्यार्थिनींना दिलासा

नारायणगाव (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ग्रामीण विद्यार्थिनी मोफत पास योजनेअंतर्गत, जुन्नर येथील शंकरराव बुट्टे पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना मोफत एसटी बस पासचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम जुन्नर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने राबवण्यात आला. प्राचार्य गणेश आहेर यांनी ही माहिती दिली. बसचा पास काढण्यासाठी त्यांना आगारात किंवा बस स्थानकात जावे लागणार नाही. ‘महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आपल्या दारी’ अशी मोहीम विद्यार्थिनींच्या पाससाठी राबविण्यात येत आहे.रांगेत उभे राहण्याची गैरसोय टाळण्यासाठी, एसटी महामंडळाचे कर्मचारी थेट शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थिनींना पासेसचे वाटप करत आहेत. महाविद्यालयातील इयत्ता १२ वीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थिनींना हे पास देण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शिक्षणासाठी घरापासून महाविद्यालयापर्यंत ये-जा करणे सोपे व्हावे आणि आर्थिक अडचणींमुळे कोणाचेही शिक्षण थांबू नये, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश आहेर यांनी यावेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. त्यांनी शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांचा लाभ घेऊन प्रगती करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे जुन्नर बसस्थानक वाहतूक नियंत्रक अमित खेडकर, शिक्षक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.या सुविधेमुळे ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाला मोठी चालना मिळणार असल्याचे मत प्राचार्य आहेर यांनी व्यक्त केले.



### बोरी बुद्रुक–पंढरपूर बस सेवा सुरु

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील बोरी बुद्रुक ते तीर्थक्षेत्र पंढरपूर या नवीन एसटी बससेवेचे ग्रामस्थांकडून उत्साहात स्वागत करण्यात आले. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांची सोय व्हावी, या उद्देशाने ही सेवा सुरू करण्यात आली आहे.सामाजिक कार्यकर्ते सुनील जाधव, पांडुरंग जाधव यांनी आमदार शरद सोनवणे आणि नारायणगाव आगार प्रमुख यांच्याकडे बोरी बुद्रुक ते पंढरपूर ही नवीन एसटी सुरू करण्याची मागणी केली होती.यांच्या पाठपुराव्यामुळे नारायणगाव आगाराने ही बस सेवा सुरू केली आहे. त्यानुसार नारायणगाव आगाराने बुधवार पासून बोरी बुद्रुक ते पंढरपूर ही नवीन एसटी सुरू केली. बोरी बुद्रुक ते पंढरपूर एसटी बस सेवेचा हा निर्णय ग्रामीण भागातील भाविकांसाठी अतिशय दिलासादायक आहे. या बसमुळे वारकऱ्यांचा व भाविकांचा प्रवास अत्यंत सुकर होणार असून, या महत्त्वाच्या सेवेचे स्थानिकांकडून जोरदार स्वागत करण्यात आले आहे.विठ्ठल दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांना आता थेट आणि हक्काचे एसटी महामंडळाचे साधन उपलब्ध झाले आहे.ग्रामीण भागातील गावे थेट पंढरपूरसारख्या तीर्थक्षेत्राशी जोडली गेल्यामुळे वेळेची आणि पैशांची बचत होणार आहे. ही बस बोरी बुद्रुकहून सुटून आळेफाटा, नारायणगाव, मंचर, राजगुरुनगर, चाकण, शिवाजीनगर, स्वारगेट, सासवड, जेजुरी, फलटण, नातेपुते मार्गे पंढरपूरला जाईल.बस बोरी बुद्रुकवरून सकाळी ९:०० वाजता सुटेल आणि दुपारी ३:३० वाजता पंढरपूरला पोहोचेल.परतीच्या प्रवासासाठी पंढरपूरवरून सकाळी ७:१५ वाजता निघून दुपारी १२:१५ वाजता बोरी बुद्रुकला पोहोचेल.

# शिक्षण संचालकांना मुख्याध्यापक महामंडळाचे निवेदन

## प्रलंबित शैक्षणिक प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी



जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाच्या वतीने राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांशी संबंधित विविध प्रलंबित प्रशासकीय व शैक्षणिक प्रश्नांबाबत माननीय शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे (कार्याध्यक्ष), महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव शिवाजी कामथे तसेच महामंडळाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनामध्ये मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदल्या, वरिष्ठ वेतनश्रेणी मंजुरी, पदमान्यता, पोस्ट क्रिएट फिक्सेशन, अनुकंपा नियुक्ती, शिक्षक व शिक्षकेतर भरती, शिक्षक भरती पोर्टलमधील अडचणी, शाळांना पूर्वीप्रमाणे मुख्याध्यापक व शिक्षक उपलब्ध करून देणे, मुख्याध्यापकांच्या हेडशिपचे संरक्षण, कनिष्ठ महाविद्यालयांच्या संच मान्यता, अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांचे प्रश्न, डिजिटल प्रणालीतील त्रुटी, ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक पदांच्या मान्यतेसह विविध विषयांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

महामंडळाने सादर केलेल्या निवेदनातील प्रमुख मागण्यांमध्ये शाळा आयडीमुळे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदली मान्यता प्रक्रियेत सुलभता आणणे, कोल्हापूर विभागातील वरिष्ठ वेतनश्रेणी मंजुरीतील अडथळे दूर करणे, रिक्त पदांच्या मंजुरीसाठी वारंवार विविध कार्यालयांमध्ये जावे लागू नये यासाठी शाळास्तरावर संच मान्यता उपलब्ध करणे, कनिष्ठ महाविद्यालयांच्या संच मान्यतेतील त्रुटी दूर करणे, अनुकंपा नियुक्तीबाबत स्पष्ट आदेश देणे आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती तातडीने सुरू करण्याची मागणी समाविष्ट होती. तसेच मुख्याध्यापक सेवानिवृत्त होईपर्यंत संबंधित शाळेला मुख्याध्यापक पदाचे संरक्षण (Headship Protection) मिळावे व त्या पदावरील सर्व शासकीय लाभ कायम राहावेत, मराठी शाळांच्या घटत्या पटसंख्येचा विचार करून संच मान्यता निकषांमध्ये सुधारणा कराव्यात, आठ वर्षांपूर्वी नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणांवर निर्णय घ्यावा, कनिष्ठ महाविद्यालयात दोन अर्धवेळ पदांऐवजी एक पूर्णवेळ पद मंजूर करावे, शिक्षक भरती पोर्टल तत्काळ सुरू करावे, विनाअनुदानित शाळांना मान्यता प्रक्रियेत सवलती द्याव्यात, ग्रंथपाल पदासाठी आवश्यक विद्यार्थी संख्या १००० ऐवजी ५०० करण्यात यावी तसेच २००८ नंतर अनुदानावर आलेल्या शाळांना वेतनेतर अनुदान मंजूर करण्यात यावे, अशा मागण्याही करण्यात आल्या.

याशिवाय इयत्ता १२ वीच्या परीक्षेतील ५० टक्के गुण व जेईई-नीट परीक्षेतील ५० टक्के गुण विचारात घेऊन मेरिट यादी तयार करण्याबाबतचा प्रस्तावही महामंडळाने मांडला.

शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी निवेदन स्वीकारून सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करून संबंधित विषयांवर नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

राज्यातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याच्या उद्देशाने मुख्याध्यापक महामंडळ सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा करीत असून, या भेटीत विविध शैक्षणिक व प्रशासकीय प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाल्याचे महामंडळाच्या वतीने सांगण्यात आले.

## श्री. धनंजय औंढेकर महावितरणच्या संचालक (संचालन) पदी रूजू

मुंबई (दै. संध्या)

महावितरण कंपनीचे संचालक (संचालन) म्हणून श्री. धनंजय औंढेकर यांनी गुरूवारी (दि. १८) कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते कार्यकारी संचालक (वितरण/प्रकल्प) म्हणून कार्यरत होते. श्री. औंढेकर गेल्या २९ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत.



नवनियुक्त संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर हे मूळचे औंढा नागनाथचे (जि. हिंगोली) आहे. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी तसेच एमबीए (फायनान्स), एनर्जी ऑडिटर, नवी दिल्ली येथून अॅडव्हॉन्स सर्टिफिकेट इन पॉवर डिस्ट्रीब्यूशन मॅनेजमेंट अभ्यासक्रम विशेष प्रावीण्यासह पूर्ण केला आहे. संचालक श्री. औंढेकर हे १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून माजलगाव (जि. बीड) येथे रूजू झाले. सन २००६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. त्यानंतर २०१६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून अधीक्षक अभियंता तर २०१९ मध्ये पदोन्नतीने मुख्य अभियंता पदी निवड झाली. या विविध पदांवर श्री. औंढेकर यांनी बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, सोलापूर, कल्याण, मुंबई मुख्यालयात काम केले आहे. संचालक (संचालन) श्री. औंढेकर हे २०२४ पासून कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या या कार्यकाळात महावितरणने मागेल त्याला सौर कृषिपंपमध्ये देशात प्रथम स्थान मिळवले. एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याचा जागतिक विक्रम केल्याचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने जाहीर केले आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घराच्या छतावरील सौर प्रकल्पांमध्ये देशात द्वितीय स्थान पटकावले. या योजनेसाठी महावितरणने देशात सर्वप्रथम फेसलेस-पेपरलेस ही ऑनलाइन सुविधा सुरु केली. नवीन वीजजोडणी, ग्राहक नावात बदल आणि वीजभार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजुरीची प्रक्रिया सुरु केली. यामध्ये संचालक श्री. औंढेकर यांचे मोठे योगदान आहे. ‘अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात सांघिक कामगिरीतून कंपनीला अधिक सक्षम, ग्राहकस्नेही व हरित ऊर्जेकडे नेण्यास आणखी प्राधान्य देण्यात येईल. नवीन वीजजोडणीची प्रक्रिया फेसलेस-पेपरलेस म्हणजे पूर्णतः ऑनलाईन करण्यात येईल.

## शेतकऱ्यांना पावसाची अपेक्षा आभाळाकडे डोळे लावून चिंताग्रस्त

कोरेगावमुळ (दै. संध्या)

जून महिना अर्ध्यावर आला तरी आभाळाने अद्याप मनसोक्त बरसण्याची चिन्हे दाखवलेली नाहीत. पावसाची आतुरतेने वाट पाहणारा शेतकरी चिंतेत आहे. अशा परिस्थितीत संयम, नियोजन आणि सावधगिरी यांनाच सर्वाधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

शेतकरी बांधवांनी शासनाच्या सूचनांनुसारच पेरणी करावी. घाईघाईने पेरणी केल्यास दुबार पेरणीचे संकट निर्माण होऊ शकते. त्यामुळे योग्य वेळेची प्रतीक्षा करणे हेच शहाणपणाचे ठरेल. शासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून योग्य वेळी आवश्यक मार्गदर्शन निश्चितपणे करेल. त्यामुळे कोणत्याही अफवा किंवा गैरसमजांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीवरच अवलंबून राहावे. पाऊस उशिरा येत असला तरी शेतकरी आणि जनतेच्या हितासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

याचबरोबर पाण्याचे महत्त्व ओळखून प्रत्येकाने पाणी बचतीचा संकल्प करणे आवश्यक आहे. घर, शेत, उद्योग आणि दैनंदिन वापरामध्ये पाण्याची नासाडी टाळूया. जलसंधारण, पावसाचे पाणी साठवण आणि पाण्याचा काटकसरीने वापर यांना प्राधान्य देऊया. आज वाचवलेला प्रत्येक थेंब उद्याच्या संकटाशी लढण्याचे बळ देणार आहे.

## मृग नक्षत्र असूनही पावसाची प्रतीक्षा कायम

कान्हाटी (दै. संध्या)

मृग नक्षत्र सुरू झाले असले तरी अद्याप अपेक्षित पावसाने हजेरी लावलेली नाही. त्यामुळे उन्हाचा तडाखा कायम असून, दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. जून महिन्याचा अर्धा टप्पा संपत आला असतानाही वातावरणात फारसा बदल न झाल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. मृग नक्षत्राला प्रारंभ झाला असला तरी अद्याप पावसाची हजेरी लागलेली नाही. परिणामी बारामती तालुक्यातील शेतशिवारात खरीप पेरणीपूर्व मशागतीची कामे खोळंबली आहेत.

मृग नक्षत्रात अपेक्षित पाऊस न पडण्याची स्थिती मागील काही वर्षांपासून कायम असल्याने खरीप हंगामातील मशागतीसह पेरण्याही लांबणीवर जात आहे. पावसाअभावी धाकधूक वाढली असून शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत. सध्या पावसाचा पत्ताच नसल्याने बियाणे बाजारातही शुकशुकाट आहे. अशा परिस्थितीत 'एल निनों'च्या सावटाने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. यावर्षी मान्सूनपूर्व पाऊस नसल्याने अनेक शेतकऱ्यांची पेरणीपूर्व मशागत राहिलेली आहे. यंदा पाऊस केव्हा येणार याबाबत वेधशाळेने स्पष्ट केलेली नाही.

## आरक्षण उपवर्गीकरणाबाबत समाजात संभ्रम पसरवू नये - डॉ. हुलगेश चलवादी

### २०२७ च्या जनगणनेतील अधिकृत आकडेवारीच्या आधारे निर्णय घ्यावा; आरपीआयची भूमिका

पुणे (दै. संध्या)

अनुसूचित जातींच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या संदर्भात समाजात विविध प्रकारचे गैरसमज आणि अफवा पसरवल्या जात आहेत. अश्या प्रकारचा संभ्रम पसरवू नये, असे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. हुलगेश चलवादी यांनी शुक्रवारी (ता.१९) केले आहे. २०२७ मध्ये जनगणनेच्या आधारे हाती येणाऱ्या अधिकृत आकडेवारीच्या आधारे निर्णय घेण्यात यावा, अशी स्पष्ट आणि ठाम भूमिका पक्षाची सुरुवातीपासूनच असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी समाजबांधवांना उद्देशून लिहिलेल्या जाहीर पत्रातून पक्षाची भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाचा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा सन्मान राखणे ही रिपब्लिकन पक्षाची भूमिका असून, संविधानाच्या चौकटीत राहूनच समाजहिताचे निर्णय व्हावेत, यावर पक्षाचा भर असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले. अनुसूचित जातींतील कोणत्याही घटकावर अन्याय होऊ नये, प्रत्येक समाजाला त्याच्या लोकसंख्येच्या आणि वस्तुनिष्ठ आकडेवारीच्या



आधारे न्याय मिळाला पाहिजे, ही ना. आठवले साहेबांची स्पष्ट भूमिका आहे. यासाठी २०२७ च्या जनगणनेतील अधिकृत आकडेवारी समोर आल्यानंतरच शासनाने पुढील निर्णय घ्यावेत, अशी पक्षाची मागणी आहे.

सध्या काही व्यक्ती आणि संघटना अपुऱ्या माहितीच्या आधारे समाजात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.अशा अफवांवर विश्वास ठेवून समाजात मतभेद निर्माण करणे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या एकात्मतेच्या विचारांना छेद देणारे आहे. त्यामुळे समाजबांधवांनी संयम बाळगावा आणि अधिकृत माहितीची प्रतीक्षा करावी, असे आवाहनही डॉ.चलवादी यांनी केले. ना.रामदास आठवले यांनी आपल्या पत्रात स्पष्ट केल्याप्रमाणे, अनुसूचित जातीतील सर्व ५९ समाज एकत्रित आहेत आणि एकत्रितच राहतील. समाजातील कोणत्याही घटकावर अन्याय होऊ नये यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असून, गरज पडल्यास समाजाच्या हक्कांसाठी संघर्ष करण्यासही ते कटिबद्ध आहेत. आपली एकजूट हीच आपली खरी ताकद आहे. संविधान, सामाजिक न्याय आणि समतेच्या मूल्यांवर विश्वास ठेवत सर्व समाजघटकांनी एकत्र राहावे, असे आवाहन डॉ.हुलगेश चलवादी यांनी केले.

# स्मार्ट मीटर न बसविण्यासाठी जनता आक्रमक

नारायणगाव (दै. संध्या)

राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य यांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ यांच्या वतीने आज महावितरण कार्यालयात स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेविरोधात निवेदन देण्यात आले. यावेळी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता श्री. अनिल साहेबराव मुरदंडगौडा आणि राजे ग्रुपच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र वाद निर्माण झाला. राजे ग्रुपच्या निदर्शनास आले आहे की, महावितरणने नियुक्त केलेल्या थर्ड पार्टी एजन्सीचे काही कर्मचारी ग्राहकांना विश्वासात न घेता, "मीटर रीडिंग घेण्यासाठी आलो आहोत" असे सांगून गुपचूप जुन्या मीटरच्या जागी स्मार्ट मीटर बसवत आहेत. या प्रकाराबद्दल अनेक ग्राहकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून ही पद्धत फसवणूक आणि ग्राहकांच्या अधिकारांची पायमल्ली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



वीज अधिनियम, २००३ अंतर्गत वीज वितरण परवाना धारकाने ग्राहकांशी पारदर्शकता, न्याय्य वागणूक आणि नियामक आयोगाने ठरविलेल्या प्रक्रियेचे पालन करणे आवश्यक आहे. ग्राहकांना तक्रार निवारणाचा अधिकार तसेच वीज सेवांबाबत माहिती मिळविण्याचा अधिकार आहे. वीज सेवा देताना ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करणे ही वीज वितरण कंपनीची वैधानिक जबाबदारी आहे.

कर्नाटक उच्च न्यायालयासमोर स्मार्ट मीटर संदर्भातील याचिकांमध्ये BESCOM ने न्यायालयात असे नमूद केले होते की विद्यमान ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर बसविणे सर्वच प्रकरणांत अनिवार्य नाही आणि विशेषतः विद्यमान ग्राहकांच्या बाबतीत सक्तीचा प्रश्न उपस्थित होतो. तसेच न्यायालयाने ग्राहकांच्या हिताच्या मुद्द्यांवर विचार करण्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे.

नागपूर खंडपीठात सुरू असलेल्या जनहित याचिकेमध्येही न्यायालयाने स्मार्ट मीटर प्रणालीत बदल करण्यापूर्वी ग्राहकांना पूर्वसूचना देणे आवश्यक आहे का आणि ग्राहकांना स्मार्ट मीटर नाकारण्याचा अधिकार आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत.

राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य यांची स्पष्ट भूमिका आहे की, लोकांच्या संमतीशिवाय, दिशाभूल करून किंवा दबाव टाकून स्मार्ट मीटर बसविण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. ग्राहकांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक असल्यास लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन, तक्रारी, माहिती अधिकार अर्ज, ग्राहक मंच, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग आणि न्यायालयीन लढा उभारण्यात येईल.

मीटर बदलण्यापूर्वी किमान ४८ तासांची लेखी किंवा एसएमएसद्वारे सूचना द्यावी. महावितरणने अलीकडे काही भागांत अशा सूचना देण्यास सुरुवात केली आहे.

मीटर बदलण्याची संपूर्ण प्रक्रिया व्हिडिओ रेकॉर्डिंगद्वारे पारदर्शक करावी.

ग्राहकांच्या लेखी हरकती निकाली न काढता मीटर बदलू नये.

महावितरण ने नेमलेल्या थर्ड पार्टी एजन्सीच्या कर्मचारी यांनी ग्राहकांशी खोटं बोलून स्मार्ट मीटर बसवल्यास संबंधित कर्मचारी यांना ठोकून काढू आणि संबंधित अधिकारी यांना काळं फासू असा तीव्र इशारा राजे ग्रुप कडून देण्यात आला आहे.

यावेळी राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य चे पदाधिकारी जुबेर शेख, गौतम औटी, प्रसाद हिंगे, विजय घेगडे, योगेश गायकवाड,वैभव भूमकर, सुशील सोनवणे, भाग्यश्री ताजने, नागेश्वरी केदार, शमीम पटेल, अनिल ताजने, दीपक भालेराव, प्रमोद खांडगे, डॉ. सहाणे, के डी अण्णा सरवदे, स्वप्नील भुजबळ, निलेश रसाळ, विनय काळे, गिरीराज वाव्हळ, मोसीन शेख, जफर शेख, राजू पुजारी, मयूर ताजने, प्रनेश डेरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

